साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ११.०३.२०२६ | अंक नं. २८३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन मोतिबिंदू काचबिंदू नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# गॅसचा प्रचंड तुटवडा? एजन्सीची मनमानी की प्रशासनाकडून दिशाभूल

## ऑनलाईन बुकींगही होईना, जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेले क्रमांकही लागेना



शहरातील मंगळवार बाजार येथील दाणेडबरा येथील ग्राहकभांडार समोर घरगुती गॅस सिलेंडर घेण्यासाठी लागलेली रांग. (छाया - धनेश कटारिया)

नगर - शहरात गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र असून, गॅससाठी नागरिक कामे सोडून एजन्सीच्या कार्यालयाबाहेर रांगा लावत आहेत. अनेक एजन्सीकडून नवीन बुकींगही घेतले जात नाही. तसेच गॅस कंपनीच्या ऑनलाईन बुकींग पूर्णपणे बंद आहेत. गॅस वितरणाच्या तक्रारींबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या क्रमांकावरही संपर्क होत नाही. ते क्रमांक अस्तित्वात नसल्याचे सांगण्यात येते. अशी सर्व परिस्थिती असताना कंपन्यांचे अधिकारी गॅस टंचाई नसल्याचे सांगत आहेत. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडूनही वारंवार टंचाईची परिस्थिती नसल्याचे सांगितले जात आहे. मात्र लोकांना घरगुती वापराचा गॅस सिलेंडर मिळत नाही.

अमेरिका, इस्त्रायलकडून इराणवर हल्ले सुरुच आहेत. त्यामुळे आखाती देशातून होणारा इंधन वायूचा पुरवठा पूर्णपणे थांबला असल्याचे वृत्त येत आहे. त्यामुळे देशात गॅस टंचाईची स्थिती असल्याचे सांगितले जाते. व्यावसायिक गॅस सिलेंडर वाटप ५० टक्क्यावर आले आहे. घरगुती गॅस सिलेंडरसाठी १५ दिवसांपेक्षा अधिक काळ प्रतीक्षा करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. रोज सकाळी नागरिकांवर गॅस एजन्सीच्या बाहेर रांगा लावण्याची वेळ आली आहे. युद्धामुळे गॅस सिलेंडरचा पुरवठाच होत नसल्याचे एजन्सीवाले नागरिकांना सांगत आहेत. तर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे मात्र टंचाईची कोणतीही स्थिती नसल्याचे सांगत आहेत. गॅस टंचाई नाही तर लोकांना रांगा लावण्याची वेळ का येते आणि एका सिलेंडरसाठी १५ दिवसांची वाट का पहावी लागते, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

गॅस वितरणासंदर्भात नागरिकांच्या तक्रारींसाठी जाहीर केलेल्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन १८००२२४३४४ या टोल फ्री क्रमांकावर आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या १०७७ या क्रमांकावर संपर्क साधला या क्रमांकावरही संपर्क झाला नाही.

### गॅस टंचाई नाही : राजेशकुमार मिश्रा

भारत पेट्रोलियम कंपनीने जिल्ह्याचे समन्वयक राजेशकुमार मिश्रा यांना संपर्क केला असता त्यांनी अशी काही टंचाईच नसल्याचे सांगितले. बातम्या सोशल मीडियावर आलेल्या रिल्स पाहून लोक गॅस एजन्सीसमोर रांगा लावत आहेत. गॅस ऑनलाईन बुकींग केला की लगेच मिळतो. कोठेही गॅस टंचाईची स्थिती नाही, असे मिश्रा यांनी दैनिक नवा मराठाशी बोलताना सांगितले.

(पुढील मजकूर पान २ वर)

# शेअर बाजारात सेन्सेक्स ७०० अंकांनी घसरला

मुंबई - भारतीय शेअर मार्केटमध्ये ११ मार्च रोजी जोरदार पडझड पाहायला मिळत आहे. सेन्सेक्स दिवसाच्या उच्चांकावरुन जवळपास ७०० अंकांनी घसरला, तर निफ्टी २४,१०० च्या खाली आला. परदेशी गुंतवणूकदारांकडून सतत विक्री, नफावसुली आणि मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे देशांतर्गत बाजारावरील दबावात भर पडली.

देशांतर्गत बाजारात दिवसाची सकारात्मक सुरुवात केलेली पण, हेवीवेट समभागांमध्ये विक्री वाढल्याने बाजाराचा मूड बदलला. आदल्या दिवशी, १० मार्च रोजी, देशांतर्गत बाजारात शेअर बाजार गारेगार झाला होता, पण ११ मार्च रोजी उलटच चित्र दिसत आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील वाढत्या संघर्षाचा महागाई आणि जागतिक वाढीवर काय परिणाम होईल याबद्दल गुंतवणूकदार अनिश्चित आहेत.

सकाळी ११:३० च्या सुमारास सेन्सेक्स ९२५.४३ अंकांनी किंवा १.१८ टक्के घसरून ७७,२८०.५५ वर व्यवहार करत होता. निफ्टी २५५.९० अंकांनी किंवा १.०५% घसरून २४,००५.७० वर खाली आला. बाजारातील तज्ज्ञांच्या मते आजच्या शेअर बाजारातील घसरणीमागे तीन प्रमुख कारणे आहेत - विदेशी पाहुण्यांकडून सतत होणाऱ्या विक्रीचा दबाव, गुंतवणूकदारांची नफावसुली आणि मध्यपूर्वेतील मिश्र संकेतांनी भारतीय बाजाराला खाली खेचले.

गुढीपाडवा स्पेशल ऑफर!
आपल्या चार चाकी वाहनांची करा आकर्षक सजावट
कृष्णा कडून भरघोस डिस्काउंट.
कृष्णा कार सजावट
सर्व प्रकारच्या गाड्यांचे कार सजावट व ॲक्सेसरीज् शो अॅटम
सर्व फोर व्हिलरचे सिटकव्हर्स आवडीप्रमाणे अर्जंत तयार करुन मिळतील.
वेल्वेट, लेदर, ज्युट, टर्कीश, इटालियन क्लॉथ व इतर सर्व प्रकारचे कापड उपलब्ध
आहुजा ब्रदर्स - 9975364612 / 8888856688
झोपडी कॅन्टीन, रुचिरा स्वीटस् समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रॅण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट, क्राडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स, फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

गुढीपाडवा व रमजान निमित्त खास ऑफर
१ ते ८ वर्षे पर्यंतच्या मुलांचे बाबासुट १ ते १६ वर्षे पर्यंतच्या मुलांचे कुर्ता-पायजमा
रु. १५०० २०००
किंमतीचे फक्त ₹500/-
मुलींचे १ ते १६ वर्षापर्यंत पार्टी वेअर भारी क्वॉलिटीचे ड्रेस
रु. ३००० किंमतीचे फक्त ₹600/-
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

फक्त आणि फक्त नळाचे पाणी ओढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या
व्ही टाईप मोटारी उपलब्ध आहेत
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

JOIN ONLY IN 4500/-
DiSHA Computer Institute
MS-OFFICE TALLY PRIME ADV. EXCEL 3 Month
CORELDRAW PHOTOSHOP CANVA 3 Month
CAD 2D CAD 3D PHOTOSHOP 3 Month
C LANG C++ HTML 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## भवानीनगरमध्ये भरदिवसा घर फोडून रोकड व दागिन्यांची चोरी

### सव्वा लाखांचा ऐवज लंपास, चोरट्यांचा शोध सुरु

नगर – शहरातील भवानीनगर भागात भरदिवसा घरफोडीची धाडसी घटना १० मार्च रोजी घडली आहे. अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह एकूण १ लाख १८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत श्रुती शरद गुगळे (वय ३५, रा. सुखसागर बंगला, भवानीनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १० मार्च रोजी सकाळी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. सकाळी १०:३० ते दुपारी १२:५० या कालावधीत चोरट्याने संधी साधली. अज्ञात चोरट्याने सुखसागर निवासस्थानाच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कशाच्या तरी साहाय्याने तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटाचे लॉकर उघडून त्यातील २३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कडे आणि रोख १८ हजार रुपये असा एकूण १ लाख १८ हजार रुपयांचा माल लंपास केला.

या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आणि महिला पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तपासासाठी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. फिर्यादीने पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिल्यानंतर अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, भरवस्तीत झालेल्या या चोरीचा तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड स्वतः करत आहेत.

# माळीवाडा वेस पाडावी; महात्मा फुले प्रेमींच्या बैठकीत ठराव

### महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य व्हावे : शिष्टमंडळाकडून मनपाकडे निवेदन सादर

नगर – माळीवाडा येथील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक व्हावे. ही सर्व समाजाची इच्छा आहे. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व समाजाचे नेते उपस्थित आहेत. प्रशासनाने स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे. स्मारकाचे काम भव्य दिव्य होण्यासाठी वेळ प्रसंगी माळीवाडा वेस पाडावी, असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.


माळीवाडा येथील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक व्हावे यासाठी आयोजिलेल्या बैठकीत सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले आदी.

अहिल्यानगरच्या वैभवात भर टाकणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे ऊर्जास्थान आपल्या शहरात उभे राहणार आहे. माळीवाडा (अहिल्यानगर) येथे या दोन्ही महापुरुषांचा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक उभारण्याच्या कामाला गती मिळावी आणि हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे. यासाठी बंधन लॉन येथे फुले दांपत्य स्मारक समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या मागणीचे निवेदन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, महात्मा फुले सावित्रीबाई फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा.माणिक विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, भगवान फुलसौंदर, दत्ता गाडळकर, नगरसेविका गीतांजली काळे, शितल ढोणे, वर्षा सानप, सुजाता पडोळे, रूपाली दातरंगे, मंगल भुजबळ, शेंडी चे सरपंच प्रयागाताई लोंढे, मनोज ताठे, पद्मशाली समाजाचे गणेश विद्ये, श्रीनिवास बौज्ञा, महेंद्र बिज्ञा, ॲड. राजेंद्र गाली, स्वकुळ साळी समाजाचे कृष्णा बागडे, कैकाडी समाजाचे अध्यक्ष विशाल माने, पारनेरचे ओबीसी चे खंडु भुकन, ओबीसी चे अध्यक्ष दिपक खेडकर, बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड, अशोक फलके देवांग कोष्टी समाज, नाभिक समाजाचे अनिल निकम, सत्यशोधक समाजाचे ज्ञानदेव खराडे, म.फुले समता परिषदेचे अध्यक्ष ब्रीजेश ताठे, राजेंद्र ताठे, राजेंद्र पडोळे, पंडित खरपुडे, सुरेश आंबेकर, साहेबराव विधाते, अमित खामकर, संजय ताजणे, रामदास फुले, प्रकाश इवळे, रेणुका पुंड, बजरंग भुतारे, सुरेश कावळे, सुधीर पुंड, राजाराम चिपाडे, ज्ञानेश्वर रासकर, विनोद पुंड, अनिल इवळे, बजरंग भुतारे आदी उपस्थित होते.

सुरेश बनसोडे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक व्हावे हे सर्व अहिल्या नगरकरांचे स्वप्न आहे. स्मारक होण्यासाठी काही अडचणी आहेत वेळप्रसंगी आंदोलन करू व त्या मार्गी लावू. वेशीच्या आडून जे काही लोक राजकारण करीत आहेत त्यांना समाजकंटक व देशद्रोही म्हणून घोषित करावे.

यावेळी यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, प्रयागाताई लोंढे, गीतांजली काळे, सुजाता पडोळे, प्राध्यापक माणिक विधाते, पंडित खरपुडे, बजरंग भुतारे, गणेश विद्ये, कृष्णा बागडे, ज्ञानदेव खराडे, पंडित खरपुडे, रोहन सानप, खंडु भुकन, ज्ञानेश्वर रासकर आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले. राजेंद्र पडोळे यांनी आभार मानले. या बैठकीला फुले दांपत्य स्मारक समिती व जिल्ह्यातील फुले प्रेमी व विविध समाजाचे नेते उपस्थित होते.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ४७ लाखांची अफूची झाडे जप्त, एकाला अटक

नगर – कर्जत तालुक्यातील चापडगाव शिवारात प्रतिबंधित अफूची शेती केली जात असल्याचे समोर आले असून, स्थानिक गुन्हे शाखा व कर्जत पोलिसांच्या संयुक्त पथकाने छापा टाकत एका आरोपीला अटक केली आहे. तसेच या कारवाईत ४७ लाख ६४ हजार १८० रुपये किमतीची २३८.२३९ किलो वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली.



अहिल्यानगर जिल्ह्यात अंमली पदार्थांची लागवड व विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी तथा पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी अंमली पदार्थ विक्री, सेवन व अफू लागवड करणाऱ्यांची माहिती घेऊन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. यानुसार पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, समीर अभंग तसेच पोलीस अंमलदार दिपक घाटकर, विजय पवार, अतुल लोटके, संतोष खैरे, अमृत आढाव, चालक उत्तरेश्वर मोराळे आणि अर्जुन बडे यांचे पथक कर्जत पोलीस स्टेशन हद्दीत माहिती घेत होते. त्यावेळी परमेश्वर बन्सी घनवट (वय ६८, रा. चापडगाव ता. कर्जत) हा आपल्या शेतात शासनाने प्रतिबंधित केलेल्या अफूच्या झाडांची लागवड करून त्यांचे संवर्धन करत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना देण्यात आली. त्यांच्या सुचनेनुसार पथकाने कर्जत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांच्या मदतीने कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर पथक कर्जत पोलीस स्टेशन येथे जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांना लेखी अहवाल दिला. त्यानंतर विजय झंजाड, पोलीस अंमलदार संजय सानप, किरण जाधव, सचिन थोरात यांच्या पथकासह चापडगाव शिवारातील शेती गट क्रमांक १३ येथे छापा टाकण्यात आला. तेथे एका इसमास शेतात राखण करताना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव परमेश्वर बन्सी घनवट (वय ६८, रा. चापडगाव ता. कर्जत) असे सांगितले.

चौकशीदरम्यान घनवट याने शेतात असलेले पीक अफूचे असून ते दोन ते तीन महिन्यांपूर्वी लावले असल्याची कबुली दिली. तसेच त्याला पाणी व खते देऊन त्याची जोपासना करत असल्याचेही सांगितले. पोलिसांनी शेतातून २३८.२३९ किलो वजनाची अफूची झाडे जप्त केली. जप्त केलेल्या झाडांची अंदाजे किंमत ४७ लाख ६४ हजार १८० रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक शामसुंदर जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून गुंगीकारक औषधिद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा, १९८५ कलम ८ (क) व १५ (क) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास कर्जत पोलीस स्टेशन करीत आहे.

## गॅसचा प्रचंड तुटवडा?

(पान १ वरुन)

### कारवाईसाठी पथकांची नियुक्ती : हेमा बडे

जिल्ह्यात गॅसची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झालेली असताना जिल्हा प्रशासनाकडून टंचाई नसल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनीही टंचाईबाबत नकार दिला. तसेच गॅस एजन्सीवाल्यांची तपासणी करुन कारवाई करण्यासाठी पथकांची नियुक्ती केली असल्याची माहिती त्यांनी दैनिक नवा मराठाशी बोलताना दिली.

### काळ्या बाजारात दुप्पट किंमत

गॅस हा जीवनाश्यक वस्तू आहे. मात्र, सध्या या जीवनावश्यक वस्तूचीच टंचाई निर्माण झाली असून, गॅस एजन्सीवाल्यांकडून गॅस सिलेंडर मिळत नसल्यामुळे काही नागरिक काळ्या बाजारातून गॅस सिलेंडर विकत घेत आहेत. काळ्या बाजारात घरगुती गॅस सिलेंडरची किमत दुप्पट झाली आहे. तर व्यावसायिक सिलेंडरची किंमत ४ हजारावर पोहोचली आहे. युद्धाच्या सावटाखाली काळ्या बाजारात गॅस विकून उखळ पांढरे करण्यासाठी एजन्सीवाल्यांकडून टंचाई निर्माण करण्यात आली नाही ना? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

## जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान एकाचा मृत्यू

नगर – अशक्तपणा आल्याने केडगाव येथून जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा पोलिस शोध घेत आहेत. नवनाथ जराड (वय ५०, रा. डिकसळ) असे या मयत व्यक्तीचे नाव आहे.

या इसमाला अशक्तपणा आल्याने केडगाव येथून ५ मार्च रोजी त्यास १०८ रुग्णवाहिकेवरील डॉ.स्वप्निल बोटके यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तेथे उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. याबाबत नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयताचे पूर्ण नाव व पत्ता याची माहिती मिळालेली नाही.

या मयताच्या नातेवाईकांबाबत कोणाला काही माहित असल्यास त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फोन ०२१४–२४१६११७ किंवा तपासी अंमलदार संतोष लगड (मो. ८८०५९५६७२३) यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# विधिमंडळाच्या अवमान प्रकरणी अहिल्यानगरमधील राष्ट्रवादीचे सूर्यकांत मोरे यांना ३० दिवसांचा तुरुंगवास

मुंबई : अहिल्यानगरच्या जामखेडमधील राष्ट्रवादीचे (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी सूर्यकांत मोरे यांना विधान परिषद सभागृह आणि सदस्यांबाबत केलेल्या अवमानजनक वक्तव्याप्रकरणी हक्कभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. सभागृहाच्या अवमानाप्रकरणी विधिमंडळ विशेषाधिकारी समितीने मोरे यांना ३० दिवसांच्या दिवाणी कारवासाची शिक्षा सुचविली आहे. अधिवेशन संपल्यामुळे शिक्षा पूर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरित शिक्षा पुढील अधिवेशनात भोगावी लागेल, अशी शिफारसही समितीने केली आहे.

जामखेड येथे नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारादरम्यान २३ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादीचे (शरद पवार) पदाधिकारी सूर्यकांत मोरे यांनी विधानपरिषदेचे एकूण कामकाज, सदस्य यांच्याबाबत अवमानकारक वक्तव्य केले होते. सभापतींबाबतदेखील आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. याबाबत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर व श्रीकांत भारतीय यांनी मोरे यांच्याविरोधात हक्कभंग मांडला होता. विधान परिषदेच्या उपसभापती यांनी ९ डिसेंबर २०२५ रोजी या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे सोपविले होते. समितीने केलेल्या चौकशीनंतर १० मार्च रोजी समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी समितीचा अहवाल विधान परिषदेत सादर केला. त्यावेळी लाड यांनी अहवालाची आणि शिक्षेची माहिती दिली.

### हक्कभंग समितीचा १६७ पानांचा अहवाल

समितीने या प्रकरणावर सहा बैठका घेऊन सुमारे १६७ पानांचा अहवाल तयार केला आहे. मोरे यांनी सादर केलेले खुलासे, साक्षीपुरावे आणि इतर कागदपत्रांचा विचार करून समितीने हा निष्कर्ष काढला की त्यांच्या वक्तव्यामुळे विधानपरिषदेच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे. जनमानसात संस्थेबद्दल अविश्वास निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर समितीने मोरे यांना ३० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा देण्याची शिफारस केली आहे. विधिमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर कारावास भोगत असलेली व्यक्ती मुक्त केली जाते, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन जर शिक्षा पूर्ण होण्यापूर्वी अधिवेशन संपले तर उर्वरित शिक्षेसाठी पुढील अधिवेशनात त्यांना पुन्हा कारागृहात पाठविण्यात यावे, अशी शिफारस समितीने केली आहे.

## बापूराव पाचपुते यांचे अल्प आजाराने निधन



नगर – काष्टी येथील रहिवासी प्रगतशील शेतकरी बापुराव राजाराम पाचपुते (वय ८०) यांचे १० मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर घोडनदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक बापूराव पाचपुते यांचे ते वडील होत.

# मायलेकावर भरदिवसा कोयत्याने हल्ला करून सोन्याचे दागिने लुटले

### नगर–मनमाड रोडवरील घटना; सहा जणांच्या टोळक्यावर गुन्हा दाखल

नगर – कर्ज हप्ते थकीत असलेल्या गाड्या ओढून आणल्याच्या रागातून एका टोळक्याने नगर मनमाड रोडवर असलेल्या बाफना ज्वेलर्ससमोर मायलेकावर प्राणघातक हल्ला केला. या घटनेत मुलाच्या डोक्यावर कोयत्याने वार करून त्याला गंभीर जखमी करण्यात आले, तर महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून सोन्याचे दागिने आणि रोकड असलेली पर्स पळवून नेली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


फिर्यादी साबीरअली मन्सुरअली सय्यद यांचा वाहने जप्त करण्याचा व्यवसाय आहे. संशयित आरोपी सुनील जितसिंग जुन्नी याची दुचाकी बँकेने जप्त करून सय्यद यांच्या गोडावून मध्ये लावली होती. याचाच राग मनात धरून सुनील जुन्नी, शंकर पंडित, सतनाम सिंग, कुणाल सिंग, रोहित पंडित (सर्व रा. काटवन खंडोबा, अहिल्यानगर) आणि एका अनोळखी इसमाने नगर–मनमाड रस्त्यावर हा हल्ला चढवला. बाफना ज्वेलर्समधून सोने खरेदी करून बाहेर पडलेल्या फिर्यादीच्या मुलाला आणि पत्नीला आरोपींनी वाटेत गाठले. तुला जास्त माज आला आहे का, आमच्या गाड्या ओढून नेतो का? असे म्हणत सुनील जुन्नी याने कोयत्याने वार केला, ज्यामध्ये मुलगा मोहंमदअली साबीरअली सय्यद याच्या डोक्याला १५ टाके पडले आहेत. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या पत्नी फरीदाबानो यांना ही लाकडी दांडक्याने मारहाण करण्यात आली. आरोपींनी त्यांच्या जवळील ८८ हजार ४२८ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोकड आणि आधारकार्ड असलेली पर्स जबरदस्तीने हिसकावून नेली. जखमींवर सध्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी ६ आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## एमआयडीसी परिसरात चोरी; सोन्याचे दागिने केले लंपास

नगर – शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या आदर्शनगर परिसरात एका अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजस दीपक पंचमुख (वय ६०, रा. आदर्श नगर, अहिल्यानगर) या त्यांच्या घरात असताना ६ मार्चच्या रात्री १० ते ७ मार्चच्या पहाटे ५ वाजेच्या दरम्यान ही चोरी झाली. चोरट्याने ठेवलेले ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र लंपास केले.

या घटनेची माहिती १० मार्च रोजी दुपारी एमआयडीसी पोलीस ठाण्याला मिळाली. त्यानंतर तत्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि सहाय्यक फौजदार राकेश खेडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिर्यादी राजस पंचमुख यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स.फौ. राकेश खेडकर करत आहेत. भरवस्तीत झालेल्या या चोरीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी नागरिक करत आहेत.



## हनुमान चालिसा पाठ

गुरुवार दि. १२/३/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**शशिकांत गाडे (परिवार)**, यशांजली बंगला, हनुमान मंदिराजवळ, गोविंदपुरा, योगीराज गाडे ९६८९८९६९८२

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**श्री जिव्हेश्वर मंदिर**, दिल्ली गेट पटांगण, दिल्ली गेट, संजय सागावकर ९४२३४६२६७७, नरेश दुस्सा ७०३०२२३१७१


**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**
**प्रफुल्ल खंडेलवाल, सुधीर झालानी, कमलेश चुग, कैलास केदावत**, समता नगर रोड, झालानी हॉस्पिटल जवळ, ९८५०४०९९९२, ९९२२१९३९१९

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**
**स्वराज्य युवा प्रतिष्ठाण**, स्विटकॉर्नर चौक, आगरकर मळा, स्टेशन रोड

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**
**पवन भाऊ दायमा**, रामदेवरा मंदिर, चिपाडे मळा, सारसनगर, ८०८७७४४२२९

## पोलीस भरतीत निवड झाल्यावर परतीच्या प्रवासात अपघात; अहिल्यानगर येथील माजी सैनिकाचा ठाणे येथे दुर्दैवी मृत्यू

नगर –अहिल्यानगर शहराजवळील वडगाव गुप्ता (ता. नगर) येथील रहिवासी आणि माजी सैनिक लक्ष्मण बन्सी गव्हाणे (वय ४३) यांचा ठाणे येथे झालेल्या दुर्दैवी रेल्वे अपघातात मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण वडगाव गुप्ता परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.


लक्ष्मण गव्हाणे

लक्ष्मण गव्हाणे यांनी तब्बल २२ वर्षे भारतीय सैन्यात सेवा बजावून देशसेवा केली होती. गतवर्षी ते सैन्यातून निवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी अर्ज केला होता. या भरती प्रक्रियेसाठी ते आपल्या मित्र प्रमोद प्रकाश शेवाळे यांच्यासोबत ४ मार्च रोजी मुंबईला गेले होते. विशेष म्हणजे या भरती प्रक्रियेत दोघांचीही निवडही झाली होती. ही आनंदाची बातमी कुटुंबीयांना सांगून त्यांची भेट घेण्याची त्यांची आतुरता होती.

मुंबईहून परतताना ते लोकल ट्रेनने कल्याणपर्यंत येत होते. दरम्यान, ठाणे स्थानकावर ट्रेन आल्यानंतर ती कार शेडमध्ये गेली याची कल्पना दोघांनाही नव्हती. प्लॅटफॉर्म नसल्याने रेल्वे लाईन ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना दुर्दैवाने त्यांचा अपघात झाला आणि त्यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर गव्हाणे यांना तातडीने उपचारांची गरज होती. मात्र म्बुलन्सला कॉल करूनही ती वेळेवर उपलब्ध झाली नाही. त्यामुळे योग्य वेळी उपचार मिळाले असते तर कदाचित त्यांचे प्राण वाचले असते, अशी भावना स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. लक्ष्मण गव्हाणे यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, दोन मुले आणि भाऊ असा परिवार आहे. देशसेवा केलेल्या माजी सैनिकाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरातून शोक व्यक्त केला जात आहे.

## सीना नदीपात्रात कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

नगर – शहराजवळ सीनानदीपात्रात एका इसमाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. गणेश बारकू झेंडे (वय ४८, रा. नेहरू मार्केट मागे, भराड गल्ली, अहिल्यानगर) असे मृत इसमाचे नाव आहे.

मयत झेंडे काही दिवसांपासून बेपत्ता होते. १० मार्च रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास त्यांचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सीना नदी पात्रात आढळून आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली हेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हृदयविकार टाळण्यासाठी...

जे लोक आपल्या आहारात टॉमॅटाचे जास्त सेवन करतात अशा व्यक्तींमध्ये हृदयविकार होण्याची शक्यता कमी असते. प्रौढावस्थामधील असून, अनेक लोकांना हृदयविकारचा झटका आला होता. टॉमॅटोमध्ये आढळून येणारा लायकोपीन पदार्थचे आकलन केले आहे. लायकोपीन हे प्रभावशाली ऑक्सिकरण रुपात असल्यामुळे फ्री रेडिकल्स अत्याधिक प्रतिक्रियात्मक रेणू, जे रक्त प्रवाहमधील अन्य पदार्थानादेखील हानी पोहोचवू शकतात. उदाहरणार्थ प्रदूषणामुळे फुफ्फुसांचे अनेक आजार होऊ शकतात. तसेच हृदयविकार आणि कॉलेस्ट्रालपासून वाचण्यासाठी जास्त टॉमॅटो खा!

## पाककला

### डाळींबाचे रायते

**साहित्य :** दही १ कप, डाळिंबाचे दाणे अर्धा ते १ कप, जिरे पूड अर्धा चमचा, काळं मीठ पाव चमचा, लाल तिखट किंवा काळी मिरी पूड चवीनुसार, साखर अर्धा चमचा, मीठ चवीनुसार, कोथिंबीर

**कृती :** सर्वात आधी एका बाऊलमध्ये ताजे दही घ्या आणि ते रवीने व्यवस्थित फेटून घ्या, जेणेकरून त्यात गुठळ्या राहणार नाहीत. दही खूप घट्ट वाटत असल्यास त्यात १२ चमचे दूध किंवा पाणी घालू शकता. फेटलेल्या दह्यामध्ये जिरे पूड, काळं मीठ, साधे मीठ, साखर आणि थोडी काळी मिरी पूड घालून नीट मिक्स करा. आता यात डाळिंबाचे लाल दाणे घाला आणि हलक्या हाताने मिक्स करा. वरून थोडी कोथिंबीर आणि चिमूटभर लाल तिखट भुरभुरा, ज्यामुळे रायता दिसायला आकर्षक दिसेल.

## वास्तू

### क्रिस्टल कासव कोठे लावावे?

* जर तुमची इच्छा मानसिक शांती, कुटुंबातील सदस्यांमधील सुसंवादी संबंध आणि आरोग्याशी संबंधित असेल तर क्रिस्टल कासव पूर्व किंवा उत्तर दिशेने ठेवा.

* बेडरूममध्ये, बैठकीच्या खोलीत किंवा आध्यात्मिक ठिकाणी क्रिस्टल कासव ठेवल्याने मानसिक ताण कमी होतो आणि घरातील सर्व सदस्य आनंदी राहतात.

* मानसिक शांती आणि सुसंवादी वातावरण वाढवते. सकारात्मक ऊर्जा आकर्षित करते.

## सौंदर्य

कोरफड जेल हा फ्रिझी केसांची काळजी घेण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे जो तुम्ही अनेक प्रकारे वापरू शकता. एलोवेरा जेलमध्ये व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-सी आणि व्हिटॅमिन-बी असते ज्यामुळे केसांना भरपूर पोषण मिळते.

## सल्ला

जर तुम्हाला तुमच्या घराला एखाद्या आलिशान हॉटेल किंवा स्पासारखा वास यायचा असेल, तर पाण्यात ५-६ थेंब लैव्हेंडर, लेमनग्रास किंवा पेपरमिंट तेल घाला.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६

**----, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, मूळ २४।४४, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल. वाहन चिंता सतावेल. आरोग्य उत्तम राहिल. सामाजिक कार्यामध्ये यशस्वी व्हाल.

**वृषभ** : जुने मित्र भेटतील. हितशत्रुंपासून सावधान. वाहने सावकाश चालवावीत. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील.

**मिथुन** : व्यावसायिक अडचणी सतावतील. पितृचिंता जाणवेल. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**कर्क** : कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. मानसन्मानात वाढ होईल. आपल्या स्वभावावर नियंत्रण ठेवावे.

**सिंह** : धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. वडीलधाऱ्यांचा आदर करावा. व्यापार व नोकरीच्या दृष्टीने चांगला दिवस.

**कन्या** : राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल. वाहनपिडेचा संभव आहे. जुन्या-जाणत्यांचा अनुभव कामी येईल.

**तूळ** : पितृचिंता सतावेल. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**वृश्चिक** : दिवस आनंदात जाईल. मानसन्मानात वाढ होईल. आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळा.

**धनु** : पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील. पुर्वी केलेल्या श्रमांचे फळ आज मिळेल. मात्र विवेक सदैव जागृत ठेवावा.

**मकर** : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागतील. आजचा दिवस जोमदार ठरेल. भावांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ** : आपला विधायक दृष्टीकोन इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. नवीन वास्तू व वाहन घेण्यासाठी उत्तम दिवस राहिल.

**मीन** : आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल.

# शब्दगंध क्र. ७३८५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| | ■ | ९ | | | ■ | १० | |
| ११ | १२ | | ■ | १३ | | | |
| १४ | | ■ | १५ | | ■ | ■ | ■ |
| ■ | १६ | १७ | | ■ | १८ | १९ | २० |
| २१ | | | ■ | २२ | | | |
| | ■ | २३ | | | ■ | ■ | |

**आडवे शब्द :-** १) बिहारमधील एक नेते तथा माजी केंद्रीय मंत्री ७) पाच वर्षांच्या आतील मुलगा; कार्तिकस्वामी ८) लढाई; लढाईचे मैदान; वाळवंट ९) सुरुंग लावून फोडण्यासाठी वापरली जाणारी दारू १०) मुंबईतील घरगडी ११) मागे पाऊल; मागे सरणे १३) सुंदर (पुरुष) १४) कोणतेही सामान; शेतीतील उत्पन्न १५) ऐकण्याचे इंद्रिय; कर्ण १६) विश्वामित्राला भुलविणारी अप्सरा १८) तरू; झाड; वृक्ष २१) स्वामी; यजमान; पती २२) एक लांबट फळभाजी २३) टिपण; यादी

**उभे शब्द :** १) कौरवांचा कपटी मामा २) विष्णूची पत्नी; लक्ष्मी ३) राजाने बोलावलेली किंवा भरवलेली सभा ४) जोराने फुटून बाहेर आलेला ५) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग ६) अंदाज; तर्क; कयास १०) एक पक्षी; पोपट; राघू; कीर १२) काय करावे काय करू नये अशी मनाची शरीराची होणारी अस्वस्था, स्थिती १५) वडिलांचा भाऊ; चुलता १७) बसक्या नाकाचा १८) झाडावर पिकलेले फळ १९) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू २०) तांबडी फुले येणारा एक वृक्ष २१) हिंदू वर्षाचा अकरावा महिना २२) अट; परंतु; शर्त

### शब्दगंध क्र. ७३८४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| द | गा | बा | ज | ■ | स | म | ता |
| र | व | ■ | ल | व | ण | ज | ल |
| बा | रा | ■ | त | ळ | वा | ■ | ■ |
| र | न | ■ | रं | ■ | र | मे | श |
| ■ | ■ | ग | ग | न | ■ | ह | र |
| का | व | ड | ■ | वे | ■ | र | द |
| म | ■ | व | च | त | ■ | बा | ■ |
| ना | व | ड | ■ | र | ■ | नी | ट |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : लोकांच्या मापात आपण बसलो नाही की, लोक आपली माप काढायला सुरुवात करतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वर्षातील सर्वात लहान दिवसाची वैशिष्ट्ये कोणती?

२१ डिसेंबरला हिवाळी संक्रांती म्हणतात. ही खगोलीय घटना उत्तर गोलार्धासाठी खूप खास आहे, ज्यामध्ये भारताचा समावेश आहे. या दिवसाबद्दल पाच मनोरंजक तथ्ये येथे आहेत.

वर्षातील सर्वात लहान दिवस आणि सर्वात मोठी रात्र - या दिवशी, उत्तर गोलार्धात सर्वात कमी वेळ सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. परिणामी, दिवस हा वर्षातील सर्वात लहान आणि रात्र सर्वात मोठी असते. भारतात, दिवस अंदाजे १० तास १९ मिनिटे असेल, तर रात्र अंदाजे १३ तास ४१ मिनिटे असेल.

२. 'मकर राशी' वर सूर्य

खगोलशास्त्रीयदृष्ट्या, या दिवशी पृथ्वी तिच्या अक्षावर २३.५ओ सेल्सिअस कललेली असते आणि सूर्याची किरणे थेट मकर राशीवर पडतात. या स्थितीमुळे उत्तर गोलार्ध दूर असल्याचे जाणवते आणि ते खूपच थंड असू शकते.

३. तुमची सावली सर्वात लांब असेल

आज दुपारी एक मजेदार प्रयोग करता येईल. सूर्य आकाशात त्याच्या सर्वात खालच्या बिंदूवर (क्षितिजाच्या जवळ) असल्याने, दुपारी १२ वाजता तुमची सावली वर्षातील इतर कोणत्याही दिवसांपेक्षा सर्वात जास्त काळ दिसेल.

४ 'मोठ्या हिवाळ्याची' सुरुवात

विद्वान आणि शास्त्रज्ञांच्या मते, हिवाळी संक्रांतीला अधिकृतपणे हिवाळ्याची खरी सुरुवात मानली जाते. आजपासून, उत्तर गोलार्धातील दिवस हळूहळू वाढू लागतील, हा काळ भारतात दिन फिराणा म्हणून ओळखला जातो.

५. वेगवेगळ्या देशांमध्ये भिन्न हवामान

भारत, अमेरिका आणि युरोपसारख्या देशांमध्ये आजचा दिवस सर्वात लहान आणि सर्वात थंड असला तरी, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका सारख्या दक्षिण गोलार्धातील देशांमध्ये आजचा दिवस वर्षातील सर्वात मोठा दिवस असेल आणि तेथे तीव्र उष्णता (उन्हाळी संक्रांती) असेल.

२१ डिसेंबर: वर्षातील सर्वात लहान दिवस (हिवाळी संक्रांती)

१. खगोलीय घटना आणि वेळ: वर्षातून एकदा, सूर्य दक्षिण गोलार्धात पृथ्वीपासून सर्वात जास्त अंतरावर असतो, ज्याला हिवाळी संक्रांती म्हणतात. ही घटना सामान्यतः २१ डिसेंबर रोजी (कधीकधी २० ते २३ डिसेंबर दरम्यान) घडते, ज्यामुळे वर्षातील सर्वात लहान दिवस आणि सर्वात मोठी रात्र येते.

२. जागतिक ध्यान दिन: भारताने मांडलेल्या ठरावाचा स्वीकार करून, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने हा विशेष दिवस म्हणजेच २१ डिसेंबर 'जागतिक ध्यान दिन' म्हणून घोषित केला आहे.

३. तापमान आणि विज्ञान: या दिवशी, सूर्याची किरणे पृथ्वीवर सर्वात हळू पोहोचतात आणि दिवस लहान असतो. सूर्य सर्वात दूर असल्याने, तापमान कमी होते आणि थंडी जाणवते.

४. जागतिक सांस्कृतिक महत्त्व: वेगवेगळ्या देशांमध्ये हा सण एक सण म्हणून साजरा केला जातो. पाश्चात्य देशांमध्ये तो ख्रिसमसशी जुळतो, तर पूर्व आशियामध्ये (जसे की चीन), तो एकता आणि आनंदाचे प्रतीक मानला जातो.

५. भारतीय परंपरा आणि रीतिरिवाज: भारतात, हा काळ मलमास किंवा संघर्षाचा काळ मानला जातो. या काळात, उत्तर भारतात भगवान श्रीकृष्णाची पूजा आणि गीतेचे पठण पारंपारिक आहे. या दिवशी सूर्याच्या उत्तरायणाची (उत्तर हालचालीची) सुरुवात होते, जी मकर संक्रांतीइतकीच महत्त्वाची मानली जाते.

## जादूचा तलाव

एका जंगलात एक खारी राहत होती. ती खूप खेळकर होती. जंगलातील प्राण्यांनी तिला बऱ्याच वेळा समजावून सांगितले की अशा प्रकारे उड्या मारणे आणि खोड्या करणे योग्य नाही, पण ती ऐकत नव्हती. तिला हे सर्व करायला खूप आवडायचे.

एके दिवशी खार झाडावर उड्या मारत खेळत होती. तेवढ्यात अस्वल दिसला. खार उडी मारून त्याच्या पाठीवर बसली.

अस्वल म्हणाले, खार ताई तू अजूनही नेहमीसारखीच खोडकर आहेस. मागच्या वेळी, तुझ्यामुळे माझा पाय घसरला आणि मी चिखलात पडलो. हे ऐकून खार हसायला लागली.

खार म्हणाली, माफ करा अस्वल दादा मला तुला चिडवायचे आहे, पण मी वचन देतो की आज मी कोणताही खोडी करणार नाही.

अस्वल एका झाडाखाली झोपला आणि विश्रांती घेऊ लागला. थोड्या वेळाने, खारचा आवाज ऐकून तो जागा झाला. खार म्हणाली मला मदत करा, मला मदत करा, मी झाडाच्या फांदीवर अडकली आहे. अस्वल येतो तेव्हा त्याला खार शेपटीला लटकलेली दिसते,

खार म्हणाले मला वाचवा! मी झाडावर चढत असताना माझी शेपटी दोन फांद्यांमध्ये अडकली. थोड्या वेळाने, जिराफ येतो आणि खारीला झाडावरून सोडवतो. खार सर्वांचे आभार मानते.

एके दिवशी, झाडावर बसून, तिला एक माकड एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारताना दिसले. हे पाहून, खारीलाही असेच करायचे वाटले.

दुसऱ्या दिवशी, तिने जंगलापासून दूर दुसऱ्या जंगलात खेळायला जाण्याचा निर्णय घेतला. सकाळ होताच, ती सर्वांना चुकवून दुसऱ्या जंगलात पोहोचली. पोहोचताच तिला एक मोठा तलाव दिसला. तिने विचार केला, आधी आंघोळ का करू नये? ती तलावाजवळ पोहोचताच एका पक्ष्याने तिला हाक मारली. ताई, तू या जंगलात नवीन आहेस का? या तलावापासून दूर राहा. जो कोणी त्यात आंघोळ करायला जातो त्याच्या शरीराचा एक भाग जातो.

खार म्हणाली व्वा, हे कसे होऊ शकते? तू मला फक्त घाबरवत आहेस. पक्षी म्हणाला ही तुझी इच्छा आहे, मी तुला फक्त इशारा देत होतो. जा आंघोळ करून बघ, तुला कळेल. खारीने ऐकले नाही, म्हणून तिने तलावात डुबकी मारली. तिला ते खूप आवडले आणि तिने बराच वेळ त्यात आंघोळ केली. ती बाहेर आल्यावर पक्षी तिच्यावर हसले. खार म्हणाली तू का हसत आहेस?, पक्षी म्हणाला तुझी शेपटी कुठे आहे?

खारीने मागे वळून पाहिले आणि पाहिले की तिची शेपटी गेली होती. शेपटीशिवाय ती खूप वाईट दिसत होती. खार रडू लागली. ती तळ्याजवळ गेली आणि तिची शेपटी परत मागू लागली.

सकाळ संध्याकाळ झाली, पण तिला तिची शेपटी परत मिळाली नाही. पराभूत होऊन, खार परत चालू लागली. मग तळ्यातून आवाज आला.


तळे म्हणाले; हा एक जादूचा तलाव आहे. पक्ष्याने तुला येथे आंघोळ करण्यास मनाई केली होती, पण तू ऐकले नाहीस, म्हणून तू तुझी शेपटी गमावलीस. खार म्हणाली मला माफ कर, मी कधीही कोणाच्याही वस्तू न मागता वापरणार नाही.

तळे म्हणाले आता तुझ्या जंगलात जा आणि सर्व प्राण्यांची माफी माग. आजपासून खोड्या खेळणे थांबव. जंगलातील सर्वांना मदत कर, आणि हळूहळू तुझी शेपटी परत येईल.

खार जंगलात परतते. दुसऱ्या दिवशी, सर्वजण शेपटी नसलेल्या खारीची चेष्टा करू लागतात. पण खारीला वाईट वाटत नाही; ती सर्वांची माफी मागते. मग ती सर्वांना मदत करण्याचे वचन देते. पावसाळ्यात, ती लहान पक्ष्यांसाठी धान्य आणते. ती झाडांवरून फळे तोडते आणि खाली टाकते जेणेकरून अस्वल त्यांना उचलून खाऊ शकेल. अशाप्रकारे, ती सर्व प्राण्यांना मदत करू लागते आणि ते सर्व तिला आशीर्वाद देतात. त्यांच्या आशीर्वादाने तिची शेपटी हळूहळू परत वाढते. हे पाहून खारीला खूप आनंद होतो.

तात्पर्य : विनाकारण कोणालाही त्रास देऊ नये; नेहमी सर्वांची मदत करावी.

# जीवन का अमृत (भाग १)



### प्रभू से जुडना

५७. बिना किसी ऐसे की मदद के, जिसने वास्तव में अलौकिक सत्य का पान किया है, रूहानियत के रास्ते पर कोई उन्नति नहीं हो सकती । सत्गुरु ही सच्चा मित्र है। मौत के समय हर सांसारिक बंधन टूट जाते हैं। हर मित्र, हर रिश्तेदार, पत्नी और बच्चे अवश्य ही अलग हो जाएंगे। कौन है, जो दूसरे संसार में भी आपके साथ रहेगा? वह है, सत्गुरु में बसा शब्द या नाम। वह आपके हर कार्य में, यहाँ और परलोक में, आपकी सहायता करता है। मौत के समय, जब और सब हार जाते हैं, तो सत्गुरु नामलेवा की सँभाल करता है। कभी भी न चूकने वाले दोस्त की

६१. केवल जिंदा सत्गुरु के द्वारा ही कोई अंतर में प्रभु से जुड़ सकता

६२. मुझे सिर्फ यह कहना है कि क्राईस्ट या प्रभु शक्ति, जिसने चुने हुए इंसानी शरीर जीसस में काम किया, जो कि प्रभु का प्रवक्ता था, समय-समय पर जिंदा सत्गुरु के चोले में काम करती रहती है, ताकि अपने प्यारे बच्चों को अपना सके, उनका मार्गदर्शन कर सके और प्रभु तक जाने वाला सही रास्ता दिखा सके।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

तथापि आपण जर असा विचार करत राहिलो की सवयी आपसूक लागतात किंवा घटना आपोआप घडतात तर आपल्याकडे कोणतीही निवड राहणार नाही. त्या वेळी आपण काहीही बदलू शकणार नाही.: सुरेश ओबेरॉय हो, असं झालं तर आपल्याला वाटेल की आपली काहीच चूक नाहीये. त्यामुळे आपण आता जसे आहोत तसेच पुढेही राहू.

शिवानीदीदी : याचा अर्थ आपण पूर्वी स्वतःला लावून घेतलेल्या सवयी कधीच बदलणार नाहीत.

सुरेश ओबेरॉय खरं तर हे आहे की, त्याच त्या सवयींची पुनरावृत्ती केल्यामुळे त्या अजूनच प्रबळ होतील. शिवानीदीदी : सवयी आपणच तयार करतो हे जेव्हा आपल्याला समजतं तेव्हा त्या आपल्या स्वतःची निवड असतात. म्हणजेच जर त्या सवयी आपल्यासाठी गैरसोयीच्या असतील तर आपण त्या बदलू शकतो. आता सांगा, तुमचे शब्द ही कोणाची निर्मिती आहे?

सुरेश ओबेरॉय : माझी स्वतःची.

दीदी प्रेरणा कोणतीही असली तरी नेहमी हेच पडेल. ओबेरॉय हो, समोरचा माणूस कोण आहे त्यानुसार, कोणाशी काय बोलायचं हे आपण ठरवतो.

अशा प्रकारे, आपले शब्द आणि कर्म ही आपली निर्मिती आहे. क्चा, काल तुम्ही एखाद्याशी उद्धटपणे बोललात तर हे लक्षात घ्या की, ती तुमची

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

जाता जाता रागाने तो तिला म्हणाला : तुझ्या सारख्या खूप मिळतील
त्यावर ती हसून म्हणाली :
अजूनही माझ्या सारखीच पाहिजे का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ग्लोबल कॉन्फरन्स ऑफ मेडीटेशन लिडर्स कार्यक्रम कोठे पार पडला?
– नवीदिल्ली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### करवंदे

अंगावर पित्त उठले असल्यास कवठाच्या पानांचा रस अंगाला लावल्यास फायदा दिसून येतो. लहान मुलांना कृत्रिमरीत्या बनवलेल्या जॅमऐवजी कवठाच्या गरात गूळ घालून मिक्सरमधून बारीक करून तयार झालेला जॅम पोळीला आतून लावून रोल करून खाण्यास द्यावे. यामुळे शरीरातील रक्ताचे व कॅल्शिअमचे प्रमाण योग्य राहण्यास मदत होते.

कवठाची पाने स्वच्छ धुऊन त्याची मेथीच्या भाजीसारखी भाजी बनवून ती खावी किंवा ही पाने पिठामध्ये मळून थालीपिठे बनवावी. कवठाच्या पानांमध्ये भरपूर पोषक घटक, फायबर व 'ब' जीवनसत्त्व असल्याने ती आरोग्यासाठी लाभदायक असतात. कवठाची पाने ही सुवासिक व वातशामक असतात. कवठ हे उत्तेजक असून अपचन, आमांश आणि अतिसार इत्यादी विकारांवर उपयुक्त आहे. सावधानता : कवठ हे पिकलेलेच खावे. कच्चे कवठ खाल्ल्याने सर्दी, खोकला, डोकेदुखी होऊ शकते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



सुरज घाटविसावे व अहिल्यानगर शहर शिक्षक मित्र परिवाराच्यावतीने सारडा महाविद्यालयात महिला दिनानिमित्त १०० महिलांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# महिलांचा सन्मान करणे ही भारतीय संस्कृती

## लेफ्टनंट कर्नल नरेंद्र हळदणकर यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर शिक्षक मित्र परिवाराच्या वतीने शंभर शिक्षिकांचा सन्मान

नगर – महिला समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात. अहिल्यानगरची सुपुत्री अहिल्यादेवी होळकर यांनी ३०० वर्षांपूर्वी संपूर्ण भारताला स्त्रीशक्तीचे दर्शन घडवून दिले आहे. २०० वर्षांपूर्वी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी आपल्या हक्कासाठी इंग्रजांशी लढा दिला. महाराष्ट्राला महान राष्ट्र बनवण्यासाठी राजमाता जिजाऊ यांचे योगदान अतुलनीय आहे. जिजाबाईंच्या आदर्शाचे पालन केले तर प्रत्येक घरात शिवाजी घडतील. स्त्रीयांचे आदराचे स्थान आपल्या सनातन संस्कृतीत हजारो वर्षांपासून रुजलेले आहे. राजमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर यांचा जन्मदिनी महिला दिन साजरा केला तर खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल. आज येथील उपस्थित शिक्षिकांमध्ये मला शक्ती, ममता, सरस्वती यांचा त्रिवेणी संगम दिसून येत आहे, असे लेफ्टनंट कर्नल नरेंद्र हळदणकर म्हणाले.

सुरज घाटविसावे व अहिल्यानगर शहर शिक्षक मित्र परिवाराच्या वतीने पेमराज सारडा महाविद्यालय येथे जागतिक महिला दिनानिमित्त १०० महिलांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष सुनिल पंडित होते, तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल नरेंद्र हळदणकर, सिने अभिनेत्री सुनंदा शेंडे, अहिल्यानगर मनपा महापौर ज्योती गाडे, राहुरी नगरपालिका नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, नगरसेविका वर्षा काकडे, नगरसेविका संध्या पवार, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, नगरसेविका सुजाता पडोळे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन अप्पासाहेब शिंदे, विलास साठे, राजेंद्र लांडे, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, शिवाजी लवांडे, शिरीष टेकाडे, विजय पठारे, आप्पासाहेब जगताप, छबूराव फुंदे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, बाजीराव अनभुले, सचिन जाधव, सुनिल दानवे व संजयकुमार निक्रड, उद्धव गुंड, प्रसाद सामलेटी, अरुण पवार, अमोल शिरसागर, ज्ञानेश्वर बेरड, शेखर उंडे, नवनाथ घुले, अन्सार शेख, सत्यवान थोरे, कल्याण ठोंबरे आदी उपस्थित होते.

यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, इंग्रजी माध्यम, जिल्हा परिषद, महानगरपालिका शाळांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १०० महिला शिक्षिकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सिने अभिनेत्री सुनंदा शेंडे, संध्या पवार, सुप्रिया जाधव, पुष्पा बोरुडे, बाबासाहेब बोडखे, अप्पासाहेब शिंदे, सुनिल पंडित यांनीही आपल्या मनोगतातून महिला दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या निमित्ताने सन्मानार्थी महिलांसाठी खास सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुरज घाटविसावे यांनी केले तर अध्यक्ष निवड अरुण पवार यांनी केली व भाऊसाहेब कबाडी यांनी अध्यक्षीय सूचनेला अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय जावळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उमेश भोईटे, किरण डहाणे, भाऊसाहेब डोळस, प्रदीप रूपटक्के, विकास माने, स्वप्निल मकासरे, संदीप गायकवाड, अभिजीत गवारे, अतुल सारसर, दिनेश धिवर, किशोर महाजन, दीपक गोंधळे, मकरंद हिंगे, श्रीराम खाडे, जोएल थॉमस, शंकर निंबाळकर, प्रवीण पारधे, विकास सग्गम, बशीर सय्यद, रवी गावडे, मुकुंद पालवे, जावेद पठाण, फिटर पंडित यांनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## गाव




गाव किंवा ग्राम हा भारतीय लोकजीवनाचा आत्मा आहे. वाडी, वस्ती, पडळ, माळ, गाव, खेडेगाव, नगर, शहर, महानगर अशा विविध ठिकाणी माणसाने निवासाला सुरुवात केली आणि मानवी जीवनाला एक प्रकारची स्थिरता लाभली. भारतात आजही सात लाखांहून अधिक खेडी आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तत्त्वांशी अनुबंध साधून स्वतःचे अस्तित्व टिकवून आहेत. प्रत्येक गावाला एक वेगळी परंपरा आणि संस्कृतीचा एखादा वारसा लाभला आहे. भारतात तर नवपाषाण युगापासून म्हणजे अंदाजे सनपूर्व ८००० वर्षांपासून गावे अस्तित्वात असल्याचे संदर्भ आहेत. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण आहे.

अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षितता, शेती, उद्योग, कला, कारागिरी, उत्सव, सण, देवालये या सर्वांतून ग्रामजीवनाचा आनंद घेत गावे समर्थपणे उभी आहेत. गावच्या चारी बाजूला जी जमीन असे तिचे 'सीत्या, गोचर व ऊपर' असे भाग केलेले असत. सीत्या जमिनीत धान्य पेरीत, गोचर जमिनीत पशु चारीत तर ऊपर जमीन नापीक असल्याने तेथे सरपण, इंधन, गवत या गोष्टी उपलब्ध होत असत. जमिनीचे हे प्रयोजन कधी बदलत नसे. त्यावर इतरांचे आक्रमण होत नसे. आज शासनाचे नियम आणि नियंत्रण असतानाही अनेक गावातील गायराने गायब झाल्याचे आपण पाहतो. सार्वजनिक सुविधांसाठी ठेवलेल्या 'मुऱ्हाळा'सारख्या जागा कुणीतरी अनाधिकाराने बळकावलेल्या आपण पाहतो.

वेदकाळापासून गावचे नियंत्रण आणि अर्थकारण गावातच होते. 'मानसाद' या ग्रंथात ग्रामाचा वास्तुशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केला आहे. त्यात गावाचे दंडकग्राम, सर्वतोभद्र ग्राम, नद्यावर्त ग्राम, पद्मक ग्राम, स्वस्तिक ग्राम, प्रस्तर ग्राम, कार्मुक ग्राम आणि चतुर्मुख ग्राम असे आठ प्रकार पाडले होते.

क्षेत्राने आणि वस्तीने जरी ते लहान असले तरी त्यात नांदणारी संस्कृती, लोकाचार, सहजीवन यातून ते खूप उत्तुंग असायचे. वेदामध्येही गावांचा ठायी ठायी उल्लेख आहे. त्यात ग्रामस्थांनी गावासाठी देवाजवळ प्रार्थना केली आहे.

विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम् । आमच्या गावात निरोगी, परिपुष्ट विश्वाचे दर्शन घडावे. 'अनातुरम्' म्हणजे कोणी रोगी असू नये. विश्वात जो आनंद आहे, भव्यता, उदारता, व्यापकता आहे ती आमच्या गावात यावी. गाव विश्वाचे प्रतिनिधी व्हावे अशी वैदिक ऋषी प्रार्थना करीत. ग्रामजीवनात आमचे विश्वधर्माचा अर्थ सामावला होता. ग्राम हे लहानसे विश्व आहे. ग्रामधर्माचे पालन हेच विश्वधर्माचे पालन होते. गावचं विश्वरूप व्हावे आणि त्यासाठी स्वग्रामधर्म पाळला जावा या भूमिकेतून उभी राहिलेली ग्रामसंकल्पना आणि आजचे बदललेले गाव पाहता दोहोतील अंतर कसे कमी होणार हाच खरा प्रश्न आहे.

– किशोर गांधी

# ओंकार संगीत निकेतन गीतांजली सगम आणि गायत्री धनलगडे यांना संगीत विशारद पदवी प्राप्त

**परीक्षांमध्ये उज्वल परंपरा कायम**





नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या सत्र नोव्हेंबर–डिसेंबर २०२५ मधील परीक्षांमध्ये ओंकार संगीत निकेतनच्या भिंगार, दरेवाडी, जैन धर्म स्थानक शाखांमधील विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे, गायन / हार्मोनियम विषयात प्रारंभिक : प्रेम मजूकर, श्रेया पंडित, मयुरी ओमसे, श्लोक थिटे, सृष्टी शेडाळे. प्रवेशिका प्रथम : स्वराली गावडे, आदर्श मजूकर, ऊर्जा चूत्तर, अक्षरा गांधी, पूर्वा चोरबेले. प्रवेशिका पूर्ण – श्रीराम खांदवे. मध्यमा प्रथम – पार्थो नाथ, पायल राऊत, श्रद्धा शिंदे, सानवी मुरूमकर, संस्कृती कोठूळे, वैभवी चव्हाण. विशारद प्रथम – सानिका औटे, अंकित पवार. विशारद पूर्ण – गायत्री धनलगडे, गीतांजली सगम. सर्व विद्यार्थी विशेष योग्यता / प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

तबला विषयात प्रवेशिका प्रथम– अर्पित शिरसाठ. मध्यमा प्रथम – विराज लवांडे. मध्यमा पूर्ण – स्वरूप चौरे विशारद पूर्ण – जय गांधी. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

यशस्वी विद्यार्थ्यांना ओंकार संगीत निकेतनच्या संचालिका सौ. संगीता देऊळगांवकर, ओंकार देऊळगांवकर, शेखर दरवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सुरक्षा सप्ताहानिमित्त श्रावणी एंटरप्रायझेस येथे रक्तदान शिबिरात कर्मचाऱ्यांचा सहभाग



राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त श्रावणी एंटरप्रायझेस येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नगर – ५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने श्रावणी एंटरप्रायझेस, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ११ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत हे शिबिर उत्साहात चालू असून आत्तापर्यंत ३० होऊन अधिक कर्मचाऱ्यांनी रक्तदान पार पाडले. अजून हा आकडा वाढू शकतो असे आयोजक यांच्या वतीने सांगण्यात आले

या शिबिराला परिसरातील नागरिक, कर्मचारी व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या संदेशातून समाजामध्ये रक्तदानाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

अपघातग्रस्त तसेच गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाचे महत्त्व अधिक वाढावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आयोजकांच्या वतीने सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या उपक्रमास कमिन्स कंपनीचे विठ्ठल चौधरी, डॉ. सोनवणे, सुरज मांढरेयांची उपस्थिती लाभली. तसेच श्रावणी एंटरप्रायझेसचे नितीन गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

हे रक्तदान शिबिर जनकल्याण रक्तपेढी, नालेगाव यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. झेंडे, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, सिस्टर गया चव्हाण, टेक्निशियन प्रियंका आढागळे, अमित टकले, किशोर यादव, बाळासाहेब खरपुडेयांनी रक्तसंकलन प्रक्रियेत सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुपरवायझर आप्पासाहेब काळे, अमोल साळवे, सलीम सय्यद,राजू गायकवाड तसेच श्रावणी एंटरप्रायझेसच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. श्रावणी एंटरप्रायझेसच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.




MESTA ने आयोजित केलेल्या आंतरशालेय डान्स स्पर्धेत ब्ल्यू डायमंड अकॅडमी स्कूलमधील इ.६ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# डान्स स्पर्धेत ब्ल्यू डायमंड अकॅडमीचे यश

नगर – माऊली संकुल येथे MESTA ने आयोजित केलेल्या आंतरशालेय डान्स स्पर्धेत ब्ल्यू डायमंड अकॅडमी स्कूलमधील इ.६ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

महाराष्ट्राची कुलदेवी आई भवानी यांचा जयघोष, आईचा जागर, आईची लेकरावरील कृपा दृष्टी असे सर्वगोष्टीचे अत्यंत उत्कृष्ट असे सादरीकरण डान्समधून करून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

स्पर्धेत कल्याणी राजेंद्र काटे, क्रिती सर्वेश गोंड, सृष्टी शेखर कुलकर्णी, काव्या सुधाकर निकम, ईश्वरी दत्तात्रय गव्हाणे, श्रेया अनिल लोखंडे, शालूकुमारी पंकज राय, पावनी मुकुंद गायकवाड, गौरी हिरालाल गौतम, आशिया फारूक पठाण, जुनेद शाहिद सुतार, आयुष कुमार अवध, नारायण यादव, स्वराज चंद्रकांत काळे, कुणाल समीर शिंदे, हिमांशू चेतन पाटील, आर्यन विजय शिंदे, स्वराज नितीन शिंदे, आदर्श विलास आगळे, मयंक गणेश घोरपडे, विराज राजेंद्र पाटेकर, सार्थक छबुराव शेवाळे, सत्यम सिंग देसराज, सिंग राजपूत आदी विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. डान्ससाठी मयुर नवल यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे स्कूलचे प्राचार्य सुजित डोंगरे व उपप्राचार्या सौ.शारदा शेळके यांनी अभिनंदन केले आहे.


# प्रतिकूल परिस्थितीत हर्षल म्हस्केने साधले यशाचे गणित



हर्षल सीए उत्तीर्ण झाल्याबद्दल पेढे भरवून अभिनंदन करताना त्याचे आई वडील.

नगर – वडील इलेक्ट्रिशियन म्हणून कंपनीत कार्यरत... आई घर कामाबरोबरच शिवणकाम करत संसाराला हातभार लावते. पुण्यासारख्या शहरात वाढत्या महागाईबरोबर दोन हात करत दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च आई–वडिलांचा हा संघर्ष पाहत हर्षल म्हस्के यांनी कठोर मेहनत करत (सीए) चार्टर्ड अकाउंटंट या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले. आष्टी तालुक्यात सतत पडणाऱ्या दुष्काळी भागातील गहूखेल सारख्या अतिदुर्गम डोंगराळ भागात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले, ज्ञानदेव म्हस्के यांची घरची परिस्थिती हालाखीचीच, अगदी जेमतेम शेती असल्याने उदरनिर्वासाठी अडचणी येत होत्या. परंतु त्या परिस्थितीत दहावीनंतर कौशल्य विकास आणि उद्योजक अंतर्गत व्यावसायिक व विविध तांत्रिक आणि गैर– तांत्रिक ट्रेडमध्ये इलेक्ट्रिशन शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात नगर शहर गाठून पुणे, हैदराबाद, या ठिकाणी काम केले. सध्या ते सुपा येथे खाजगी कंपनीतील इलेक्ट्रिशन म्हणून काम करत आहेत. त्यांना दोन मुले, मोठा मुलगा हर्षल याने आई–वडिलांच्या कष्टाचे चीज केले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पुण्यासारख्या महागडया ठिकाणी मालानी, सोमानी, चांडक असोसिएट डेक्कन, पुणे येथे त्यांने आर्टिकलशीप पूर्ण केली. आर्टिकलशीप पूर्ण होण्यासाठी एक महिना बाकी असताना त्याने अगोदरच परीक्षा देऊन उत्तीर्ण होऊन त्याचा रिझल्ट लागलेला आहे. त्याला अडीच वर्षानंतर फायनल देता येते असे कळल्यानंतर त्यांने खूप अभ्यास करून फायनलही दिली आणि आज पहिल्याच प्रयत्नाततो अकाउंटंट (सीए) पासही झाला आहे. शिक्षणामुळे जीवनात क्रांती घडते, अभ्यासात सतत सातत्य ठेवून कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर परिस्थिती किती बिकट आणि हलकीची असली तरी शिक्षणातून आर्थिक क्रांती घडवून देते असे बाळकडू वडिलांनी त्याला दिले होते. आणि याची प्रचिती त्यांने आपल्या कृतीशील कार्यातून दाखवून दिली आहे. हर्षलच्या आईनेही घर कामाबरोबरच शिवणकाम करून त्याच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याला त्याला प्रवृत्त केले. हालकीची परिस्थिती असतानाही हर्षलने सीए ची फायनल परीक्षा पास होऊन समाजाला एक संदेश दिला आहे. वडिलांच्या मेहनतीचे चीज करून कठोर परिश्रम घेऊन शिक्षणात भरारी घेत चार्टर्ड अकाउंट सारखी कठीण परीक्षा देऊन त्यात यश संपादन केल्याने हर्षलचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

शिक्षणामुळे जीवनात अमुलाग्र बदल होतो. वडील प्रतिकूल परिस्थितीतही आम्हाच्या शिक्षणासाठी सतत पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्याची जाणीव ठेवून शिक्षणातून वैभव निर्माण करण्याचा प्रयत्न मी केला आहे. आई–वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक पाल्याने हीच जाणीव ठेवली तर जीवनात कोणत्याही बाबींची कमतरता भासणार नाही. अशा भावना हर्षल म्हस्के यांने व्यक्त केल्या.



भारत सरकारचे सहसचिव राजेशसिंग यांनी छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेला भेट देऊन शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची पाहणी केली.

# छावनी परिषदेच्या पीएमश्री शाळेला केंद्रीय नोडल अधिकाऱ्यांनी दिली भेट

## विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांचे कौतुक

नगर – प्रधानमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार पीएमश्री शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, पायाभूत सुविधा, अध्ययन निष्पत्ती तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्रीय सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारचे सहसचिव राजेशसिंग यांनी जिल्ह्यातील पीएमश्री शाळांचा दौरा केला.

या दौऱ्यात त्यांनी १० मार्च रोजी छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेला भेट देऊन शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची पाहणी केली.

यावेळी छावनी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पल्लवी विजयवंशी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी राजश्री घोडके, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, जिल्हा नोडल अधिकारी विलास साठे, लेखाधिकारी भालेराव, केंद्रप्रमुख बाबा गोसावी आदी अधिकारी उपस्थित होते.

भेटी दरम्यान शाळेतील अद्ययावत संगणक कक्ष, स्काऊट–गाईड पथक, मुलींचे स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक, महाराष्ट्राच्या परंपरेचे दर्शन घडविणारा पोवाडा गायन, स्थानिक परिसरातील ऐतिहासिक वास्तूंचे प्रदर्शन तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच शाळेतील भौतिक सुविधांचाही त्यांनी आढावा घेतला.

शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी दिली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपक्रमांचे सहसचिव राजेशसिंग यांनी कौतुक केले. विशेषतः पोवाडा सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी रोख बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले.

# एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचे यश




एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचे यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

**१८ विद्यार्थी एन.एम.एम.एस. परीक्षेत पात्र; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव**

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांसाठी दरवर्षी १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

या केंद्रशासित परीक्षेस विद्यालयातील एकूण २९ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामध्ये सत्यजीत संजय नाबगे याने विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला असून आयुष रवींद्र फाटक याने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थ्यांनी गणित विषयात २० पैकी २० गुण मिळवून आपली उत्कृष्ट गुणवत्ता सिद्ध केली. तसेच बुद्धिमत्ता विषयामध्ये सत्यजीत नाबगे याला ९० पैकी ८४, तर आयुष फाटक याला ९० पैकी ८३ गुण मिळाले आहेत.

या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये ऋतुजा पोकळे, यशवर्धन पाटील, प्रिया दिघे, अभय वनवे, सार्थक भापकर, सोहम काळे, अथर्व चाकुरे, श्रेया लोखंडे, अनुष्का कर्डिले, समृद्धी मोढवे, रेवा आळंदी, श्रावणी कराड, ज्ञानेश्वरी खेडकर, मोहम्मद तांबोळी, अमृता प्रजापती आणि सोनाक्षी नवसुपे यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विक्रम वाडेकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, माजी सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर, विष्णुपंत म्हस्के, अंबादास गारुडकर, शामराव व्यवहारे, विश्वासराव काळे, माजी सहसचिव के. एच. शिंदे, तसेच माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख मंगेश कारखिले (गणित), सुनीता लांडगे (सामान्य विज्ञान), अमृता थोरात (समाजशास्त्र) आणि प्रदीप पालवे (बुद्धिमत्ता) या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लाड-पागे समितीनुसार नियुक्त मनपा कर्मचाऱ्यांना कर्जसुविधा

### १२ मार्चपासून अर्ज स्वीकृती; कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा : विजय कोतकर



नगर – अहिल्यानगर महानगरपालिका मधील लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित यांनी कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही माहिती संस्थेचे चेअरमन विजय कोतकर यांनी दिली.

लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक व कौटुंबिक आर्थिक अडचणीमुळे पतसंस्थेकडे कर्जासाठी मागणी केली होती. त्याची दखल घेत पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत संबंधित कर्मचाऱ्यांना संस्थेचे सभासद करून घेण्याचा व संस्थेच्या नियम व अटींच्या अधीन राहून त्यांना आवश्यकतेनुसार कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर कर्मचाऱ्यांकडून सभासदत्वासाठी १२ मार्च पासून अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर चेअरमन यांच्या अंतिम मंजुरीनंतर पात्र कर्मचाऱ्यांना कर्ज अदा करण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला, नियुक्ती आदेशाची झेरॉक्स प्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड, दोन छायाचित्रे तसेच पगाराचा दाखला आदी आवश्यक कागदपत्रांसह पतसंस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा व आवश्यकतेनुसार कर्जसुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन विजय कोतकर तसेच संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत राजिंदर सिंहजी महाराज यांच्या दर्शन व सत्संगाचे अहिल्यानगर शहरात ३१ मार्च व १ एप्रिलला आयोजन

### मिस्कीननगर येथे सभामंडपाचे भूमिपूजन, प्रवचनामुळे नगरमध्ये आध्यात्मिक वातावरण निर्माण होईल : ॲड.सचिन जगताप



सावन कृपाल रुहानी मिशनच्या वतीने संत राजिंदर सिंहजी महाराजांच्या प्रवचन व सत्संग सोहळ्याच्या सभामंडपाचे भूमिपूजन करताना ॲड.सचिन जगताप. समवेत उद्योजक अमोल गाडे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, उपाध्यक्षा कमला कुकरेजा, खजिनदार सेवाराम रामनानी, सुनील मिस्कीन, शिवकुमार छाबरिया, सुरेश पंजवानी, रोहित मिस्कीन आदींसह भाविक.

नगर – संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे नगरमध्ये आगमन होणे हे नगरकरांच्या भाग्यचे आहे. त्यांच्या पदस्पर्शाने अहिल्यानगरची भूमी पावन होणार आहे. संत राजिंदर सिंहजी महाराजांच्या दर्शन व प्रवचनामुळे नगरमध्ये आध्यात्मिक वातावरण निर्माण होईल. शहरासह जिल्ह्यातील सर्व भाविकांनी या आध्यात्मिक पर्वणीचा व प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड.सचिन जगताप यांनी केले.

अहिल्यानगर शहरात सावन कृपाल रुहानी मिशनच्या वतीने संत राजिंदर सिंहजी महाराज यांच्या पावन सानिध्यात प्रवचन व सत्संग तसेच ध्यान व दिक्षा सोहळ्याचे आयोजन ३१ मार्च व १ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता करण्यात आले आहे. या आध्यात्मिक कार्यक्रमासाठी तारकपूरच्या मिस्कीननगर येथील मैदानात उभारण्यात येणाऱ्या मंडपाच्या कामाचा शुभारंभ ॲड.सचिन जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी उद्योजक अमोल गाडे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, उपाध्यक्षा कमला कुकरेजा, खजिनदार सेवाराम रामनानी, सुनील मिस्कीन, शिवकुमार छाबरिया, सुरेश पंजवानी, रोहित मिस्कीन आदींसह भाविक व नागरिक उपस्थित होते.

यावेळी भाविकांनी संत राजिंदर सिंहजी महाराजांचा जयजयकार केला.

या आध्यात्मिक सोहळ्यासाठी २०० फुट बाय ५०० फुटाचा मंडप व स्टेज उभारण्यात येणार आहे. देशातून, शहरासह आजूबाजूच्या जिल्ह्यातूनही हजारो भाविक या सोहळ्यास येणार असल्याने भाविकांना येथे चांगल्या सोयीसुविधा मिळण्यासाठी नियोजन केले आहे. कार्यक्रमासाठी भाविकांसाठी अत्याधुनिक पद्धतीचा मंडप, प्रशस्त बैठक व्यवस्था व वाहनतळ, प्रकाश व साउंड व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व महाप्रसादाच्या व्यवस्थेसह इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया यांनी दिली.

संत राजिंदर सिंहजी महाराज यांचे नगरमध्ये १ एप्रिल असे दोन दिवस धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. २ एप्रिल रोजी नगर तालुक्यातील वाळूंज येथेही महाराजांच्या आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कृपाल आश्रमचे सचिव सुशील बजाज यांनी केले.

# आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, गोवा यांच्यात सामंजस्य करार

### डॉ. शिवाजीराव काकडे यांची माहिती

नगर – अहिल्यानगर शहरातील आनंदधाम समोरील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, गोवा यांच्यात सामंजस्य करार केल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे यांनी दिली.

या करार सही करण्याच्या कार्यक्रमाला भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव, आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, AIIA चे संचालक (कार्यभार) प्रा. (वैद्य) पी. के. प्रजापती, AIIA गोव्याच्या अधिष्ठाता प्रा. (डॉ.) सुजाता कदम तसेच प्राध्यापकवर्ग आणि अधिकारी उपस्थित होते.

या करारामुळे मुळे आयुर्वेद आणि आधुनिक संशोधन क्षेत्रात नवीन संधी निर्माण होण्यास मोठी चालना मिळणार असून या दोन्ही संस्थांच्या विद्यार्थ्यांना विविध आजारांवरील संशोधनासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या कराराचा मुख्य हेतू म्हणजे दोन्ही संस्थांमधील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनातील संधी तसेच औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव उपलब्ध करून देणे हा आहे. असल्याची



आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, गोवा यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे आदी.

माहिती संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे यांनी दिली. ह्या कराराच्या हेतूने दोन्ही महाविद्यालये सहयोगी कार्यक्रम व इतर शैक्षणिक देवाणघेवाणीच्या माध्यमातून शैक्षणिक व वैज्ञानिक सहकार्यावर आधारित परस्पर लाभदायक संबंध प्रस्थापित करणार आहेत तसेच दोन्ही संस्थांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्यामधील संयुक्त सहयोगी संशोधन कार्यांना प्रोत्साहन मिळणार आहे.

या दोन्ही संस्था संयुक्त परिसंवाद, चर्चा–सत्रे आणि इतर शैक्षणिक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रयत्नशील राहतील.

या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध आजारांवरील रुग्णांवर संशोधन करण्याची मौल्यवान संधी उपलब्ध होणार आहे. आयुर्वेद व फार्मसी या दोन क्षेत्रांतील ज्ञानाची सांगड घालून नवीन उपचार पद्धती, औषध विकास व संशोधन प्रकल्प राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला वाव मिळून भविष्यात आरोग्य क्षेत्रात नवे संशोधन घडण्यास मदत होणार असल्याचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे यांनी सांगितले.

वरील उपलब्धी साठी विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे आणि सर्व प्राध्यापक यांचे संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, विश्वस्थ पृथ्वीसिंह काकडे, औषधनिर्माण शास्त्रविभागाच्या संचालिका भाग्यश्री काकडे पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी अभिनंदन केले.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव तसेच आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, AIIA चे संचालक (कार्यभार) प्रा. (वैद्य) पी. के. प्रजापती, AIIA गोव्याच्या अधिष्ठाता प्रा. (डॉ.) सुजाता कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत करार करण्यात आला.



साईदीपसहयाद्री हॉस्पिटलमध्ये हृदयाच्या धामण्यामध्ये कॅल्शियमचे ब्लॉकेज दूर करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता च्या वापर करून जिल्ह्यातील पहिली हृदय शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

## 'एआय'च्या सहाय्याने साईदीपसहयाद्री हॉस्पिटलमध्ये पहिली हृदयविकार शस्त्रक्रिया यशस्वी : डॉ. किरण दीपक

नगर – साईदीपसह्याद्री मणीपाल हॉस्पिटल मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या साहाय्याने orbital Atherectomy ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली अशी माहिती हृदयविकार तज्ञ डॉ. किरण दीपक यांनी दिली.

हृदयाच्या धामण्यामध्ये कॅल्शियमचे ब्लॉकेज दूर करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जिल्ह्यातील पहिली हृदय शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. यामुळे हृदयाकडे जाणारा रक्त प्रवाह पूर्ववत करण्यास मदत मिळाल्याने रुग्णाच्या हृदयाला होणारा धोका टळला. या शस्त्रक्रियेसाठी बंगलूरू येथील हृदयरोग तज्ञ डॉ. दाविंदर सिंग चड्ढा, डॉ. श्रीधर बधे, डॉ. किरण दीपक व त्यांचे सहकारी डॉक्टर्स व कॅथलॅब टीम यावेळी उपस्थित होती.

साईदीपसहयाद्री मणीपाल हॉस्पिटल मधील अत्याधुनिक हृदयरोग विभाग, ज्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करून ही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. यापूर्वी बलूनच्या साहाय्याने हृदयाची झडप बदलणे इत्यादी यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत, असे डॉ. किरण दीपक म्हणाले.

## डिस्ट्रीक्ट रोटरॅक्टपदी ॲड. सत्यजीत कराळे

नगर – रोटरॅक्ट डिक्ट्रिक्ट ३१३१ मध्ये पीएचएफ रोट. ॲड. सत्यजीत शिवाजीराव कराळे पाचील यांची डिस्ट्रिक्ट रोटरॅक्ट रिप्रेझेंटेटिव्ह नॉमिनी म्हणून निवड झाली आहे.



सत्यजीत कराळे पाटील यांचा रोटरॅक्टमधील प्रवास २०१५ साली रोटरॅक्ट क्लब ऑफ मराठवाडा मित्र मंडळ, पुणे, कोथरूड या क्लबचे चार्टर सदस्य म्हणून सुरू झाला. सेवाभावातून सुरू झालेला हा प्रवास गेल्या १० वर्षांत नेतृत्व, समर्पण आणि कार्याच्या विविध टप्प्यांतून अधिक भक्कम झाला. २०१९–२० या रोटरी वर्षात अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांच्या क्लबने मोठ्या संख्येने सेवा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले. समाजावर प्रत्यक्ष परिणाम करणारे उपक्रम राबविणे हेच खरे नेतृत्व असल्याचा त्यांचा विश्वास या कामातून दिसून येतो.

सत्यजित यांच्या उपक्रमांपैकी प्रोजेक्ट न्याय संहिता हा विशेष उल्लेखनीय उपक्रम ठरला आहे.

# अहिल्यानगर येथील 'अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी'ला बेस्ट कॉलेज ॲक्टिव्हिटी कंडक्टिंग अ‍ॅवॉर्ड पुरस्कार प्रदान

नगर – फार्मसी क्षेत्रातील सातारा येथे आयोजित परिषद महाएप्टीकॉन २०२६ मध्ये रेज फाऊंडेशन, अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाला बेस्ट कॉलेज ॲक्टिव्हिटी कंडक्टिंग अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले. महाविद्यालयाने वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या उत्कृष्ट नियोजन व अंमलबजावणीची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.




फार्मसी क्षेत्रातील सातारा येथे आयोजित परिषद महाएप्टीकॉन २०२६ मध्ये रेज फाऊंडेशन, अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाला बेस्ट कॉलेज ॲक्टिव्हिटी कंडक्टिंग अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले.

ही परिषद Association of Pharmaceutical Teachers of India (APTI) च्या महाराष्ट्र राज्य शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत राज्यभरातील फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. परिषदेदरम्यान फार्मसी शिक्षणातील नवीन संशोधन, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक पद्धती यावर विविध व्याख्याने, चर्चासत्रे आणि सादरीकरणे आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमात प्राचार्य डॉ.योगेश सुरेश बाफना व कॉलेज चे प्राध्यापकवर्ग यांना मंचावर बोलावून बेस्ट कॉलेज ॲक्टिव्हिटी कंडक्टिंग अवॉर्ड प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात आयोजित केलेल्या आरोग्य जनजागृती मोहिमा, रक्तदान शिबिरे, औषध वापराबाबत जनजागृती कार्यक्रम, वृक्षारोपण मोहीम, शैक्षणिक कार्यशाळा, सेमिनार, क्रीडा स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला असल्याची दखल परीक्षक समितीने घेतली.

या यशामध्ये कॉलेज चा उपप्राचार्या वर्षाराणी आव्हाड, डिप्लोमा विभाग प्रमुख माधुरी पवार व प्रा. पीयुष जंगम, सुधीर गर्जे, तृप्ती शिंदे, कांचन गलगते, स्नेहा कणसे, मिलिंद क्षीरसागर, नीता येणारे, वृषाली गायकवाड, शीतल खंडागळे, रुचिता पवार, योगेश पंडित, अपर्णा पंडित, अनिल गावडे, अमोल बर्डे, बाळासाहेब भागवत, स्वाती भुजबळ, पल्लवी गुगळे, धनश्री गटणे, सोनी मिश्रा, अमृता कुलथे, वैशाली शिंदे, शारदा भागवत याचा ही या यशामध्ये सहभाग आहे.






महाराष्ट्र ग्राहक पंचायत जिल्हा शाखेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त वेगळ्या क्षेत्रात कर्तबगारी गाजवणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

# ग्राहक पंचायतीतर्फे महिलांचा हृद्य सत्कार

### कुटुंबीय व समाजाचा पाठिंबा व विश्वासामुळेच मिळवले यश

नगर – पती, सासर– माहेरचे कुटुंबीय पालक विद्यार्थी तसेच ग्राहक यांचा विश्वास व भक्कम पाठिंब्यामुळेच आपण यशस्वी होऊ शकलो अशी बोलकी प्रतिक्रिया वैशिष्ट्यपूर्ण सेवा देणाऱ्या महिलांनी सत्कार स्विकारतांना व्यक्त केली.

महाराष्ट्र ग्राहक पंचायत जिल्हा शाखेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थी ग्राहकांना सोडवणाऱ्या नगर शहरातील बहुतेक पहिल्या स्कूल बस चालक सौ. वैशाली संतोष भोकरे, नायरा पेट्रोल पंप कर्मचारी सौ.सोनिया कांबळे, सौ.सोनाली येलुलकर, सौ.अर्चना बोरकर, सौ. मानसी कापसे, सौ. छाया आवटी, सौ. ज्योती पवार या वेगळ्या क्षेत्रात कर्तबगारी गाजवणाऱ्या महिलांचा सत्कार केला, त्यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

यावेळी ग्राहक पंचायतीचे सचिव ॲड. सिद्धार्थ वाघमारे यांच्या १०३ वर्ष पूर्ण करणाऱ्या मातोश्री श्रीमती ताराबाई वाघमारे तसेच जिल्हा अध्यक्ष गजेंद्र शिरसागर यांच्या मातोश्री श्रीमती क्षीरसागर यांचाही सत्कार करण्यात आला.

सत्कारार्थी सर्व महिलांचा जिल्हाध्यक्ष क्षीरसागर, उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा सचिव वाघमारे, सौ. शलाका रसाळ, सौ.कटारिया यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प व उदबोधक ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सौ. भोकरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले, त्या म्हणाल्या, राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथील सर्वसाधारण कुटुंबात आपला जन्म झाला. विवाहानंतर पती संतोष भोकरे यांच्या पाठिंब्याने आपण चार चाकी वाहन चालवायला शिकलो व त्यानंतर कौटुंबिक व्यवसायाची गरज म्हणून स्कूल बस चालक म्हणून कामाला प्रारंभ केला. या कामी शाळेचे व्यवस्थापन, पालक व विद्यार्थी तसेच माझ्या सासर व माहेरच्या कुटुंबियांचा भक्कम पाठिंबा लाभला, त्यातूनच आपण हे कार्य यशस्वीरित्या करत आहोत. आपण या सर्वांचे कृतज्ञ आहोत. प्रतिक्रिया व्यक्त करताना ग्राहक पंचायतीने आपल्या या कार्याची दखल घेतल्यामुळे त्यांना अश्रु अनावर झाले.

यानंतर गुलमोहर रस्त्यावरील नायरा पेट्रोल पंपावरील महिला कर्मचारी यांचा जिल्हा संघटक राजेंद्र कळमकर जिल्हा सहसचिव संजय जोशी, कोषाध्यक्ष कृष्णराव बागडे, अजित कटारिया हस्ते सत्कार करण्यात आला. कोणतीही पूर्वसूचना न देता हा सत्कार केल्यामुळे पेट्रोल पंपाचे मालक सुभाष कोळी, अक्षय कोळी तसेच महिला कर्मचाऱ्यांनी ग्राहक पंचायत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. अचानक झालेल्या या सत्कारामुळे त्याही भारावून गेल्या होत्या.

यावेळी श्री. साळवे, संतोष भोकरे, वाघमारे कुटुंबीय उपस्थित होते. ॲड. वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. क्षीरसागर यांनी महाराष्ट्र ग्राहक पंचायतीच्या कार्याबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन बागडेंनी केले. जोशींनी आभार मानले.

## भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन स्थगित

नगर – भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसंदर्भात भूमि अभिलेख कर्मचारी कृति समिती व पालक संघटनांच्या वतीने पुकारण्यात आलेले काम बंद आंदोलन अखेर स्थगित करण्यात आले असून, विभागाचे कामकाज आता सुरळीत सुरु झाले असल्याचे सांगण्यात आले.

विविध मागण्यांसाठी भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले होते. त्याअनुषंगाने ६ मार्च रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अप्पर मुख्य सचिव, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, भूमि अभिलेख राजपत्रित अधिकारी संघटनेचे अध्यक्ष व इतर प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत मंत्री बावनकुळे यांनी भूमि अभिलेख विभागातील भूकरमापकांना तांत्रिक वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले असून, आगामी मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडून अंतिम करणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनातच निश्चित प्रवासभत्ता समाविष्ट करुन देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीस पाठविला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विभागाचा आकृतीबंध मंजुर झाला असून शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आपले काम बंद स्थगित करण्याची घोषणा केली.

संप यशस्वी होण्यासाठी नाशिक विभागाचे अध्यक्ष रवि डिक्रुज, अहिल्यानगर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राहुल मापारी, संघटक उमेश कोदे, मिलींद भिंगारदिवे, शशिकांत धस, गणेश गरड, श्रीराम बोरुडे, भास्कर हराळ, राजेंद्र नरवडे, प्रविण गायकवाड, जगदीश जावळे, संग्राम लवांडे, सर्वेश्वर वैकर, कानिफनाथ निमसे, प्रविण अवचरे, प्रदिप अवचर, वनिता खुर्द, धनेश्वरी गरदास, रुपाली गवळी, स्मिता केदारी, सविता बिडकर, संगीता कापडणी, गीता मेरगू यांचे सहकार्य लाभले.


## गौरी तिकोणे भरतनाट्यम विशारद पूर्ण

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या विशारद परीक्षेत गौरी गंगाराम तिकोणे हिने उत्तम गुण संपादन करीत भरतनाट्यम विशारद पूर्ण केल्याची माहिती राधिका भरतनाट्यम अकॅडमीच्या संचालिका कविता भांबरे –घोलप यांनी दिली.



गेली १२ वर्ष गौरी भरतनाट्यम शास्त्रीय नृत्य शिकत असून, तिने गीत–रामायण, द्रौपदी वस्त्रहरण, कृष्ण लीला, जटायू मोक्ष, शबरी, भक्त शिरोमणी मीरा अशा सुंदर नृत्य नाटिकेत विशेष कलाकृती सादर केल्या आहेत, तसेच मेहेर ट्रस्टच्या सेवेत सलग तीन वर्ष सहभाग घेतला. तिला आई सीमा तिकोणे आणि वडिलांचे विशेष सहकार्य लाभले. गायक आदेश चव्हाण आणि मृदंग करीता उत्कर्ष दळवी सरांनी साथ दिली. तर केंद्र प्रमुख अविनाश देऊळगावकर यांनी कौतुक केले आहे.

# स्टेशनवर केला जातो अंधार!



भारतीय रेल्वे सातत्याने तांत्रिकदृष्ट्या स्वतःला आधुनिक करत आहे. 'हाय-स्पीड ट्रेन', 'वंदे भारत'सारख्या अत्याधुनिक गाड्या, स्मार्ट स्टेशन्स, डिजिटल तिकीट प्रणाली आणि सुधारित प्रवासी सुविधा यांमुळे भारतीय रेल्वेचे जाळे आज जगभर चर्चेचा विषय ठरत आहे. भारतात प्रवास करणारे परदेशी पर्यटक रेल्वेची व्याप्ती, व्यवस्थापन आणि सुविधा पाहून अनेकदा आश्चर्यचकित होतात.

भारतीय रेल्वेशी संबंधित काही वैशिष्ट्यपूर्ण आणि थक्क करणारी तथ्ये आहेत. ती आजही अनेक प्रवाशांना अचंबित करतात. त्यापैकीच एक म्हणजे ट्रेन आली, की काही क्षणांसाठी स्टेशनवरील वीज गायब होणे. हे कोणत्याही बिघाडामुळे नाही, तर एका खास तांत्रिक कारणामुळे घडते. तामिळनाडूतील चेन्नईजवळ असलेले ताम्बरम रेल्वे स्टेशन हे देशातील एकमेव असे स्टेशन आहे, जिथे ट्रेन गेली की काही क्षणांसाठी स्टेशनवरील वीजपुरवठा बंद होतो.

प्लॅटफॉर्मवर उभे असलेले प्रवासी अचानक अंधार पडलेला पाहून चकित होतात. अनेक जण याला गूढ घटना समजतात, तर काही लोक यामागे तांत्रिक बिघाड किंवा विचित्र कारणे असल्याचं मानतात. प्रत्यक्षात, ताम्बरम स्टेशनवरील ही घटना पूर्णपणे तांत्रिक कारणांमुळे घडते. हे स्टेशन दोन वेगवेगळ्या 'पॉवर सब-स्टेशन्स'च्या मध्ये असलेल्या 'न्यूट्रल सेक्शन' मध्ये येते. या 'न्यूट्रल सेक्शनमध्ये ओव्हरहेड इक्विपमेंट' म्हणजेच ट्रेनला वीज पुरवणाऱ्या तारांमध्ये करंट नसतो.

लोकल ट्रेन एका पॉवर झोनमधून दुसऱ्या पॉवर झोनमध्ये प्रवेश करते, तेव्हा काही सेकंदांसाठी वीजपुरवठा बंद केला जातो. याच क्षणी स्टेशनवरील लाईट्सही थोड्या वेळासाठी बंद होतात. मात्र ही प्रक्रिया नियोजित आणि सुरक्षित असून याचा प्रवाशांच्या सुरक्षिततेवर कोणताही परिणाम होत नाही.

कॅलिडोस्कोप

# जगातलं सर्वात सुरक्षित घर

आपलं रहातं घर, इमारत सुरक्षित असावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. म्हणूनच भूकंपप्रवण क्षेत्रात विशेष काळजी घेतली जाते. विशिष्ट पद्धतीने इमारती उभारल्या जातात. अग्निशमन यंत्रणा बसवली जाते. सुरक्षेचे शक्य ते सर्व उपाय केले जातात. मात्र एखादा अणूबॉम्ब पडला तर काहीच खैर नसते. पण जगात अत्यंत सुरक्षित असं एक घर आहे. या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही. हे अमेरिकेसारख्या बलशाली राष्ट्राच्या प्रमुखाचं घर असावं, असं तुमच्या मनात आलं असेल. पण हे घर पोलंडमध्ये आहे. विशेष म्हणजे ते एका सामान्य माणसाचं घर आहे. पोलंडच्या राजधानीत रहाणाऱ्या एका माणसाला सर्वात सुरक्षित घर बांधायचं होतं. मग



त्याने देशातल्या सर्वात नावाजलेल्या आर्किटेक्चर फर्मकडे याबाबत विचारणा केली. यानंतर कंपनीने बांधलेलं घर बघून कोणीही थक्क होईल. हे जगातलं सर्वात सुरक्षित घर ठरलं आहे. विशेष म्हणजे फक्त एक बटण दाबल्यानंतर हे घर चारही बाजूंनी सिमेंटच्या भिंतींनी बंद होतं. हे घर एखाद्या किल्ल्यासारखं दिसू लागतं.

यानंतर कोणीही घरात प्रवेश करू शकत नाही. घरमालकाची इच्छा असेल तर दुसऱ्या मजल्यावरच्या पुलावरून घरात शिरता येतं. घराच्या पुढच्या बाजूला शटरही आहे. पूर्णपणे बंद झाल्यानंतर या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही, असा या आर्किटेक्चर फर्मचा दावा आहे.


# या वस्तूंची होतेय ऑनलाईन विक्री

तुम्ही बऱ्याच वस्तू ऑनलाईन खरेदी केल्या असतील. सर्वसाधारणपणे आपण कपडे, मोबाईल, घरगुती उपकरणं अशा वस्तूंची ऑनलाईन खरेदी करतो. ब्रिटनमध्ये मात्र एक विचित्र वस्तू ऑनलाईन खरेदी केली जाते. ही वस्तू खरेदी करण्याचा विचारही आपण कधी करू शकणार नाही. आता ही कोणती वस्तू असेल असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. ही वस्तू म्हणजे मानवी कवटी! हो, हे खरं आहे. ब्रिटनमध्ये मानवी कवटीची ऑनलाईन खरेदी-विक्री होते. इन्स्टाग्रामवर ऑनलाईन खरेदीचे हे व्यवहार होत आहेत. सर्वसाधारणपणे संशोधन आणि वैद्यकीय कारणांसाठी हाडं आणि कवटीची खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. ब्रिटनमध्ये मानवी कवटी आणि हाडांच्या खरेदी-



विक्रीवर कोणतेही निर्बंध नाहीत. त्यामुळे या वस्तू इथे अगदी सहज उपलब्ध होतात. या वस्तू खरेदी करण्याची इच्छा असणारा ग्राहक वैयक्तिक पातळीवर विक्रेत्याला संपर्क करतो. यानंतर त्यांच्यातले व्यवहार पूर्ण होतात. स्टॉकहॉम विद्यापीठाच्या २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार ब्रिटनमध्ये मानवी कवटी आणि हाडांची बाजारपेठ ४६ हजार पाउंड म्हणजेच जवळपास ४० लाख रुपयांची आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये या बाजारपेठेत वाढ झाल्याचं या क्षेत्रातल्या तज्ज्ञांचं म्हणणं आहे. सध्या ही बाजारपेठ ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

# चला, वृक्षारोपण करू या



जगभरातच जंगलांचं प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. बेसुमार जंगलतोडीचे परिणाम आता दिसू लागले आहेत. पूर, दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अनेक लोक बेघर होत आहेत. जागतिक तापमानवाढीची समस्या 'आ वासून' उभी आहे. काही लोक 'झाडं लावा, झाडं जगवा'सारखी मोहीम हाती घेतात, रोपटी लावतात, ती जगवतात. जगभरात विविध दिन साजरे केले जातात. मात्र झाडं लावण्याचा कोणताही दिवस नसतो. असा एक विशेष दिन असणं गरजेचं आहे. या दिवशी लोकांना सुट्टी द्यायला हवी. यामुळे झाडांचं आणि पर्यायाने जंगलांचं प्रमाण वाढेल. तुर्कस्थानमधल्या एका माणसाने ही कल्पना दिली. एनस साहिन असं या माणसाचं नाव आहे. त्याच्या ट्विटला तुफान प्रतिसाद मिळत आहे. 'माझ्याकडे एक कल्पना आहे. आपण राष्ट्रीय वृक्षारोपण दिन साजरा करू या. एक दिवस सुट्टी घेऊन झाडं लावू या, आपण जगापुढे चांगलं उदाहरण ठेऊ या आणि येत्या पिढ्यांना हिरवागार देश भेट देऊ या', असं ट्विट त्याने केलं होतं. तुर्कस्थानच्या राष्ट्रपतींनीही या ट्विटची दखल घेतली आहे. त्यांनी त्यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली आणि राष्ट्रीय वृक्षारोपण दिनाला मान्यताही दिली. यानंतर साहिननेही राष्ट्रपतींचे आभार मानले. यामुळे तुर्कीत वृक्षारोपणासाठी सुट्टी मिळणार आहे. मात्र त्याआधीच झाडं लावण्यासाठी असंख्य हात पुढे आले आहेत.

# रेट विचारला, मार खाल्ला!

मध्यंतरी प्रसिद्ध गायिकेसोबत एक धक्कादायक प्रकार घडला. एका गाण्याच्या कार्यक्रमात एक गायिकेला 'आपका क्या रेट है' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यानंतर चिडलेल्या गायिकेनं चक्क बोलणाऱ्या व्यक्तीवर पायातली चप्पल काढून मारण्यास सुरुवात केली. यावेळी काही लोकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्नही केला.

ही घटना बिहारमधील सारण इथं घडली. प्रसिद्ध गायिका निशा उपाध्याय यांच्या गाण्याच्या कार्यक्रम सुरु होता. सगळे गाणं ऐकण्यात मग्न होतं. इतकं वातावरण चांगलं असताना कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणाऱ्या व्यक्तीनं गायिकेला 'आपका क्या रेट है', असा प्रश्न विचारला. हे ऐकताच गायिका त्याच्या अंगावर धावून गेली.

गायिकेनं पायातली चप्पल काढली आणि त्या सूत्रसंचलन करणाऱ्या व्यक्तीच्या अंगावर धावून गेली. या वेळी उपस्थित असलेल्या लोकांनी तिला अडवण्याचा प्रयत्न केला, परंतु यानंतरही गायिका त्याच्याशी ओरडून बोलली. हा सगळा प्रकार घडल्यानंतर गायिका मंच सोडून गेली. लोकांनी तिला अडवण्याचा प्रयत्न केला, परंतु गायिका प्रचंड संतापली होती.



# एकमेकांशी बोलण्यास बंदी?

छत्तीसगडमधील सेन समाजाने साखरपुडा आणि लग्नाच्या कालावधीदरम्यान एकमेकांशी मोबाईलवरून बोलू नये असा नवीन आदेश जारी केला आला आहे. साखरपुड्यानंतर तुटणाऱ्या नात्यांचं प्रमाण वाढत असल्याचं पाहून समाजानं हे पाऊल उचलल्याचं सांगितलं जात आहे. या नव्या नियमांनुसार, आता होणाऱ्या पती-पत्नीला एकमेकांशी फोनवर एकांतात बोलता येणार नाही. अत्यंत आवश्यक असल्यास त्यांना आपल्या पालकांसमोरच संवाद साधावा लागणार आहे. दोघांनी इतर व्यक्ती समोर उपस्थित नसताना संवाद साधू नये, असं नव्या आदेशात सांगण्यात आलं आहे.

सेन समाजाचे जिल्हाध्यक्ष संतोष कौशिक आणि प्रदेश संघटन मंत्री गौरी शंकर श्रीवास यांनी या निर्णयासंदर्भात भाष्य केलं. साखरपुड्यानंतर भावी नवरा-नवरी तासनतास फोनवर बोलतात. या संवादादरम्यान अनेकदा वादाचे प्रसंग उद्भवतात. बरेचदा वेगवेगळ्या विषयांवर बोलताना एकमेकांचे विचार न पटल्यानं लग्न मोडण्यापर्यंत परिस्थिती जाते. हेच टाळण्यासाठी हा नवा नियम लागू करण्यात आला आहे.

सध्या बालोद जिल्ह्यात लागू असलेला हा नियम लवकरच संपूर्ण प्रदेशात लागू केला जाण्याची शक्यता आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीनं अन्य धर्म स्वीकारल्यास त्याच्याशी 'रोटी-बेटी'चे संबंध तोडले जातील, असा इशाराही सेन समाजाकडून नव्या फतव्यात देण्यात आला आहे.

मोबाइलच नव्हे, तर दोन्ही पक्षांत वादाची स्थिती निर्माण होते म्हणून लग्नात मेहुणीद्वारे नवऱ्या मुलाचे बूट लपवण्याची प्रथा आता



बंद करण्यात आली आहे. साखरपुड्याच्या कार्यक्रमात केवळ १५ ते २० लोकांनाच नेण्याची परवानगी असेल, असं नव्या नियमामध्ये सांगण्यात आलं आहे.

समाजातील काहींनी या निर्णयाचे स्वागत केलं असलं तरी काही तरुणांनी याला वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा असल्याचं म्हटलं आहे. आयुष्यभर सोबत राहणाऱ्या जोडीदाराला समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक आहे, असं मत या गटानं मांडलं आहे. त्यामुळंच त्यांनी या निर्णयाचा विरोध केला आहे.

# निरागस कैदी



दुकानात चोरांनी धुमाकूळ घातला असेल, कोणी उगाचच त्रास देत असेल तर पोलिसात तक्रार केली जाते. मात्र न्यूझीलंडमधल्या वेलिंग्टन इथल्या एका दुकानदाराने चक्क दोन पेंग्विनविरोधात पोलिसात तक्रार दिली. गंमत म्हणजे न्यूझीलंड पोलिसांनी या पेंग्विनना ताब्यातही घेतलं. मात्र काही वेळानंतर त्यांना सोडून देण्यात आलं. इथल्या सुशीची विक्री करणाऱ्या दुकानात हे पेंग्विन सारखे घुसत होते. यामुळे दुकानदार खूपच वैतागला होता. त्याने पेंग्विनना बरेचदा बाहेर काढलं. पण ते पुन्हा पुन्हा येत असल्याने अखेर पोलिसात तक्रार द्यावी लागली. पेंग्विनची ही जोडी काही काळ पोलिसांच्या ताब्यात होती. मग त्यांना वेलिंग्टन हार्बरवर सोडण्यात आलं. या ठिकाणी पेंग्विनची ६०० जोडपी रहातात. सध्या पेंग्विनचा प्रजननाचा काळ असल्यामुळे हे पक्षी सुरक्षित जागेच्या शोधात भटकत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. याच कारणासाठी पेंग्विनची ही जोडी दुकानात घुसखोरी करत असावी.

# मृत्यूपूर्वीचे काही क्षण...



मृत्यू हे अंतिम सत्य आहे. मृत्यूला टाळणे अशक्य आहे, मात्र तरी लोक त्याबद्दल बोलणे आणि विचार करणे टाळतात. अनेकांना नैसर्गिक मृत्यू येतो, तर काहीजण आजारपणामुळे मरण पावतात. लोकांना मृत्यूवर बोलणं आवडत नसलं, तरी अतिदक्षता विभागात काम करणारे लोक दररोज आपल्या डोळ्यांसमोर मृत्यू पाहत असतात. अमेरिकेच्या फ्लोरिडातील २९ वर्षीय नर्स कर्स्टी रॉबर्ट्स यांनी गेल्या चार वर्षांत अनेक रुग्णांना अखेरचे श्वास घेताना आपल्या डोळ्याने पाहिले आहे.

त्यांनी सांगितलं, की अनेक रुग्ण मृत्यूच्या अगोदर एक प्रकारचा आध्यात्मिक बदल अनुभवतात. हा बदल वैद्यकीय शास्त्रासाठी पूर्णपणे समजावून सांगणं सोपं नाही. कर्स्टी यांच्या मते ही वेळ वेगळीच असते. ती रुग्णाच्या शेवटच्या क्षणांना वेगळ्याच प्रकारची शांतता देते. अनेक रुग्ण आपल्या शेवटच्या क्षणांत एकसारख्याच गोष्टी बोलतात. त्यांची प्रकृती बाहेरून ठीक दिसत असली, तरी त्यांना मृत्यूची चाहूल लागलेली असते.

कर्स्टी रॉबर्ट्स यांच्या मते मृत्यूपूर्वी काही रुग्ण म्हणतात, 'माझ्या कुटुंबियांना सांगा, की मी त्यांच्यावर प्रेम करतो.' काहीजण म्हणतात की, 'मला बरं वाटत नाही.' काही रुग्ण असंही म्हणातात की 'मला माहित आहे की मी आता जाणार आहे.' तसेच काही लोक 'मला वाटतं कोणीतरी मला बोलावत आहे' असं म्हणतात. अशा वाक्यांनंतर थोड्याच वेळात अनेक रुग्ण या जगाचा निरोप घेतात.

'मिरर'च्या अहवालानुसार, कर्स्टी यांनी सांगितलं, की अनेकदा रुग्णांच्या सर्व टेस्ट आणि व्हायटल्स सामान्य असतात. त्यांच्या शरीराला कोणताही मोठा धोका दिसत नाही, मात्र अचानक काहीतरी बदलते. हा बदल यंत्रणादेखील पकडू शकत नाही. याला एक प्रकारचे ट्रांजिशन म्हणता येईल. या क्षणी औषधांचा परिणाम थांबतो आणि आत्मा हळूहळू निरोपाची तयारी करत असल्यासारखे वाटते.

# अंटार्क्टिकातील खुनी धबधबा!

जगातील सर्वात थंड आणि निर्जन खंड असलेल्या अंटार्क्टिकामधली एक जागा पाहून धाडसी लोकांच्याही अंगावर शहारे येतात. ही जागा म्हणजे 'मॅकमुर्डो ड्राय व्हॅली'. इथे असलेल्या टेलर ग्लेशियरमधूनमधून खाली वाहणारी एक धार अक्षरशः मानवी रक्तासारखी लाल दिसते. १९११ पासून हा 'खुनी धबधबा' म्हणजेच 'ब्लड फॉल्स' वैज्ञानिकांसाठी एक गूढ कोडे ठरला होता, मात्र आता या रहस्याचा उलगडा झाला आहे.

वैज्ञानिकांना वाटले, की हा लाल रंग एखाद्या लाल शैवालामुळे असावा, पण संशोधनातून वेगळेच सत्य समोर आले. संशोधकांच्या मते, ग्लेशियरच्या सुमारे १,३०० फूट खाली खाऱ्या पाण्याचे एक विशाल सरोवर आहे. ते सुमारे २० लाख वर्षे बाहेरील जगापासून पूर्णपणे वेगळे राहिले होते. या सरोवरातील पाण्यात मीठाचे प्रमाण अत्यंत जास्त आहे आणि त्यात लोखंड मोठ्या प्रमाणात विरघळलेले आहे. हे लोखंडयुक्त पाणी बर्फातील भेगांमधून बाहेर येऊन हवेतल्या ऑक्सिजनच्या संपर्कात येते, तेव्हा रासायनिक प्रक्रिया (ऑक्सिडेशन) होते. लोखंडाला गंज चढतो आणि त्यामुळे पाण्याचा रंग गडद लाल होतो. त्यामुळेच हा धबधबा रक्तासारखा दिसतो.

सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे या सरोवरात ऑक्सिजन आणि सूर्यप्रकाश नसतानाही सूक्ष्मजीव जिवंत आहेत. वैज्ञानिकांच्या मते अंटार्क्टिकासारख्या अत्यंत कठीण परिस्थितीत जीवन अस्तित्वात राहू शकते तर मार्स किंवा युरोपा (बृहस्पतीचा उपग्रह) येथेही जीवन असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा केवळ एक धबधबा नाही, तर पृथ्वीबाहेरील जीवनाच्या शोधासाठी एक महत्त्वाची खिडकी आहे. ब्लड फॉल्स हे निसर्गातील अद्भुत रहस्य असून विज्ञानाला नवीन दिशा देणारे ठरले आहे.



# न्यायालयाचे आदेश धाब्यावर; शिक्षकांचा आता 'आरपार'चा लढा! प्रलंबित वेतनासाठी १६ मार्च रोजी आयुक्तालयावर 'आक्रोश मोर्चा'

नगर – गेल्या तीन वर्षांपासून थकीत वेतनासाठी शासन आणि प्रशासनाचे उंबरठे झिजवणाऱ्या शिक्षकांच्या संयमाचा बांध अखेर फुटला आहे. माननीय उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असूनही प्रशासकीय अनास्थेमुळे वेतन देयके रखडल्याने, 'शिक्षक भारती' संघटनेच्या वतीने १६ मार्च रोजी पुणे येथील शिक्षण आयुक्तालयावर 'प्रचंड आक्रोश आंदोलन' करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयात 'अवमान याचिका' (Contempt of Court) दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

### नेमके प्रकरण काय?

राज्यातील अनेक शिक्षकांची गेल्या तीन वर्षांपासूनची वेतन देयके तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे प्रलंबित आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालयाने विविध याचिकांमध्ये शिक्षकांच्या बाजूने निकाल देऊन वेतन अदा करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. शिक्षण संचालकांनी १३ जून २०२५ रोजी पत्र काढूनही विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने यावर कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही.

### प्रशासकीय 'तारीख पे तारीख'

शिक्षक भारती संघटनेने यापूर्वी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दालनासमोर धरणे आंदोलन केले होते. त्यावेळी प्रशासनाने मार्च २०२५ अखेरपर्यंत सर्व देयके निकाली काढण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, वर्ष उलटूनही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वेतन हा कर्मचाऱ्याचा मालमत्तेचा हक्क (कलम ३००-अ) असून तो नाकारणे हा नैसर्गिक न्यायाचा खून आहे, अशी भावना संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी व्यक्त केली आहे.

### आंदोलनाच्या प्रमुख मागण्या

सर्व न्यायालयीन थकीत देयके व्याजासह तात्काळ ऑनलाइन प्रणालीद्वारे वितरित करावीत., न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास विलंब लावणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी.

### मंत्रालयापर्यंत निवेदनाचे पडसाद

या आंदोलनाची पूर्वसूचना केवळ शिक्षण आयुक्तांनाच नाही, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि आमदार कपिल पाटील, आमदार सत्यजित तांबे यांनाही देण्यात आली आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

आता १६ मार्चला होणाऱ्या या 'आक्रोश' आंदोलनानंतर तरी झोपलेले प्रशासन जागे होणार की शिक्षकांना पुन्हा न्यायालयाचीच पायरी चढावी लागणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या आंदोलनात राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, रूपालीताई बोरुडे, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप, आधी पदाधिकारी सदस्य वंचित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित राहणार आहे

न्यायालयाचा अवमान हा गंभीर गुन्हा आहे. जर १६ मार्चपर्यंत ठोस निर्णय झाला नाही, तर आम्ही केवळ आंदोलनच करणार नाही, तर संबंधित दोषी अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या पिंजऱ्यात खेचू, असा इशारा शिक्षक भारती संघटना (पुणे विभाग) प्रा.महेश पाडेकर यांनी दिला आहे.

# कत्तलीसाठी जनावरे घेवून जाणारा टेम्पो पकडला

### हातमपुरा चौकात पोलिसांची कारवाई, ३.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – शहरातील हातमपुरा चौक परिसरात पहाटेच्या सुमारास पोलिसांनी मोठी कारवाई करत गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणारा टेम्पो पकडला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल महेश सुभाष पवार यांनी याप्रकरणी फिर्याद दिली असून, अशोक लेलंड कंपनीच्या 'दोस्त' टेम्पोमधील अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रात्र गस्त घालणाऱ्या पोलिसांनी १० मार्च रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ संशयास्पद टेम्पो (क्र. एम.एच. १६, सी.डी. ४८८९) अडवण्यात आला. या वाहनाची झडती घेतली असता, त्यात अत्यंत क्रूरपणे पाय बांधलेल्या अवस्थेत गोवंशीय जनावरे मिळून आली. यामध्ये एक पांढऱ्या रंगाची गावरान गाय आणि दोन कालवडींचा समावेश आहे. कत्तलीच्या उद्देशाने या जनावरांची कोणतीही चारा-पाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने वाहतूक केली जात असल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी ३ लाख रुपये किमतीचा टेम्पो आणि ५५ हजार रुपयांची जनावरे असा एकूण ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार साबीर शेख व विनोद बोरगे पुढील तपास करत आहेत.

# नगरमध्ये राष्ट्रीय एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ



महानगरपालिकेच्या बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करताना महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, सभापती दिपालीताई बारस्कर, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, नगरसेविका मंगल लोखंडे, सुनीता गेनप्पा, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दीपमाला चव्हाण आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे राष्ट्रीय एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

महापालिकेच्या आठ आरोग्य केंद्रांवर ही लस उपलब्ध असून आरोग्य विभागाचे कर्मचारी घरोघरी जाऊन लसीकरणाबाबत जनजागृती करणार आहेत. शहरासाठी एकूण ४ हजार लसी उपलब्ध होणार असून पहिल्या टप्प्यात १५०० मुलींना लस देण्यात येणार आहे. शासनाने एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली असून गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रतिबंध करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. महापालिकेच्या महिला नगरसेविकांनी आपल्या प्रभागामध्ये पुढाकार घेऊन समाजामध्ये जनजागृती करावी आणि मुलींचे लसीकरण करून घ्यावे. प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ असतो. ही लस महापालिकेच्या माध्यमातून मोफत उपलब्ध आहे, तर खाजगी रुग्णालयांमध्ये यासाठी सुमारे चार हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे सर्वांनी मिळून एचपीव्ही लसीकरणाची विशेष मोहीम यशस्वीपणे राबवावी, असे आवाहन महापौर गाडे यांनी केले.

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा संसर्गामुळे होणारा गंभीर आजार आहे. भारतात महिलांमध्ये स्तन कर्करोगानंतर गर्भाशय मुखाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपल्या देशात २०२४ मध्ये या कर्करोगाचे सुमारे ७८ हजार रुग्ण आढळले असून त्यापैकी ४२ हजार महिलांचा मृत्यू झाला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, नगरसेविका मंगल लोखंडे, सुनीता गेनप्पा, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दीपमाला चव्हाण उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, महापालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत आणि नागरिकांनी त्याचा लाभ घेणे गरजेचे आहे. योग्य प्रचार-प्रसाराच्या माध्यमातून एचपीव्ही लसीकरणाची मोहीम ही यशस्वी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या, कर्करोग हा अत्यंत भयानक आजार असून महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. हा आजार होऊ नये यासाठी शासनाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एचपीव्ही लस उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींना ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले, लस ही आजार होऊ नये म्हणून दिली जाते. कॅन्सरमुक्त समाज घडवायचा असेल तर एचपीव्ही लस घेणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींना लस देऊन घ्यावी.

# तलवार, सत्तूर, मिरची पूड घेवून दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीतील चौघांना पकडले



नगर – तलवार, सत्तूर, मिरची पूड, लोखंडी कटावणी घेवून दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीतील चौघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुक्यातील मदडगाव शिवारात पकडले आहे. तर त्यांचे अन्य ३ साथीदार अंधाराचा फायदा घेवून पसार झाले आहेत. पकडलेल्या आरोपींकडून पोलिसांनी हत्यारे जप्त केली आहेत. १० मार्च रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली.

छगन चिंतामण काळे (वय ४३, रा. तळेवस्ती, कडा, ता.आष्टी, जि.बीड), महावीर पंढरीनाथ भोसले (वय ३९, रा. शेरी खुर्द, ता. आष्टी जि. बीड), कदम चिंचावन काळे (वय ३५, रा. तळेवस्ती कडा, ता. आष्टी, जि.बीड), इदगर गारमन चव्हाण (वय ३८, रा. शेरी खुर्द, ता. आष्टी जि. बीड) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. तर प्रविण हबाजी भोसले, प्रफुल्ल हबाजी भोसले (दोघे रा. पिंपरखेड ता. आष्टी जि.बीड), संतोष उर्फ सिंधुशा सुर्यभान काळे रा. गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीगनर) हे तिघे जण फरार झाले आहेत.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, लक्ष्मण खोकले, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे, प्रशांत राठोड, सुनिल मालणकर यांचे पथक १० मार्च रोजी नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत दरोडा प्रतिबंधक पेट्रोलींग करीत असतांना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, ६ ते ७ इसम दोन मोटार सायकलवर येवुन मदडगाव गावचे शिवारातील टाकळी काझी ते अंमळनेर जाणारे रोडवर थांबुन सशस्त्र दरोडा घालण्याचे तयारीत आहेत. ही माहिती मिळताच पथकाने तात्काळ मदडगाव कडे धाव घेतली. तेथे पाण्याचे टाकीजवळ अंधारात काही इसम संशयीतरित्या हातामध्ये हत्यारे घेवुन उभे असल्याचे दिसुन आले. तेव्हा पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन चार जणांना पकडले. या गडबडीत तिघे अंधारात पसार झाले. पकडलेल्या आरोपींकडून एक लोखंडी कटावणी, एक लोखंडी सत्तुर, एक तलवार, मिरची पुड, ३ मोबाईल मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या आरोपींच्या विरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४), ३१०(५), सह आर्म अ‍ॅक्ट ४/२५ प्रमाणे दरोडा तयारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चांदबीबी महालाजवळ तरुणावर चाकूने हल्ला

### मोबाईल परत मागितल्याच्या रागातून कृत्य, गुन्हा दाखल

नगर – नगर पाथर्डी रोडवर चांदबीबी महाल परिसरात एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. जुना मोबाईल परत मागितल्याच्या कारणावरून चिडलेल्या आरोपीने फिर्यादीच्या पोटावर चाकूने वार करून त्याला गंभीर जखमी केले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत दत्तात्रय अशोक शिंदे (वय २०, मूळ रा. बीड, सध्या रा. बोल्हेगाव) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुण नगर-पाथर्डी रस्त्यावरील चांदबीबी महाल सर्कलजवळ उभा होता. यावेळी त्याने आरोपी संकेत पालवे (रा. मेहकरी, अहिल्यानगर) याला आपला मोबाईल परत मागितला. मोबाईल मागितल्याचा राग मनात धरून आरोपीने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने जवळ असलेला चाकू काढून दत्तात्रयच्या पोटावर वार केला. जखमी तरुणाने दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी आरोपी संकेत पालवे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### सीना नदी पात्रात कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

नगर – शहराजवळ सीनानदीपात्रात एका इसमाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. गणेश बारकू झेंडे (वय ४८, रा. नेहरू मार्केट मागे, भराड गल्ली, अहिल्यानगर) असे मृत इसमाचे नाव आहे.

मयत झेंडे काही दिवसांपासून बेपत्ता होते. १० मार्च रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास त्यांचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सीना नदी पात्रात आढळून आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला.

याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली हेत.

# शिक्षण सेवक योजना रद्द करा; तत्कालीन शासनाचा शब्द पाळा

### शिक्षण सेवकांना पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती द्यावी : बाबासाहेब बोडखे; राज्य शासनाला शिक्षक परिषदेचे निवेदन



नगर – राज्यातील शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षकांना थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा निर्णय घेऊन तत्कालीन शासनाने दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल तसेच शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग यांना निवेदन पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच शंभर टक्के अनुदानित खाजगी शाळांमध्ये शासन निर्णय १३ ऑक्टोबर २००० अन्वये शिक्षण सेवक योजना लागू करण्यात आली होती. या योजनेनुसार शिक्षक पदावर थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती न देता तीन वर्षांच्या कालावधीसाठी 'शिक्षण सेवक' या नावरूपाने मानधनावर करार पद्धतीने नियुक्ती देण्याची व्यवस्था करण्यात आली.

त्या काळी राज्याची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे शिक्षकांची रिक्त पदे त्वरित भरणे शासनाला शक्य नव्हते. मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षण सेवक योजना तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आली होती. राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर ही योजना संपुष्टात आणण्यात येईल, असे आश्वासन तत्कालीन शासनाने दिले होते, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, लोकशाही पद्धतीने सत्तेवर येणाऱ्या शासनाने पूर्वीच्या शासनाने दिलेला शब्द पाळणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शासनाच्या निर्णयांवरील विश्वासार्हता कमी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. सध्याच्या परिस्थितीत राज्य शासन शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यास सक्षम आहे. त्यामुळे शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षक पदांवर थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे शिक्षक परिषदेने म्हटले आहे.

हा विषय केवळ नियुक्तीचा नसून शिक्षकांच्या सन्मान आणि अस्मितेशी संबंधित आहे. शिक्षण सेवक म्हणून दीर्घकाळ काम करणाऱ्या शिक्षकांना योग्य न्याय मिळावा, यासाठी शासनाने या प्रश्नाकडे गंभीरपणे आणि सर्वंकषपणे पाहणे आवश्यक आहे. राज्य शासनाने शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षकांना पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा निर्णय जाहीर केल्यास शिक्षण क्षेत्राबाबत शासनाची सकारात्मक भूमिका स्पष्ट होईल, असे बाबासाहेब बोडखे म्हणाले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल फेसबुकवर 'आक्षेपार्ह पोस्ट'

### सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल, तांत्रिक तपासाद्वारे आरोपीचा शोध सुरु

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे वडील रामजी सपकाळ यांच्याबद्दल फेसबुकवर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अश्लील आणि आक्षेपार्ह विधान केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सामाजिक भावना दुखावल्या गेल्याने संबंधित फेसबुक खातेधारकावर नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


सावेडी येथील वसंत विहार भागात राहणारे योगेश रघुनाथ साठे हे ७ मार्च रोजी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास फेसबुक पाहत होते. यावेळी विकास देवकर नावाच्या व्यक्तीच्या फेसबुक खात्यावरून महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट प्रसिद्ध करण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या पोस्टमध्ये वापरलेली भाषा अत्यंत प्रक्षोभक आणि समाजात तेढ निर्माण करणारी होती. या प्रकारामुळे संपूर्ण आंबेडकरी जनतेच्या धार्मिक आणि सामाजिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. याप्रकरणी योगेश साठे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी फेसबुक खाते धारक विकास देवकर याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे. समाजात अशांतता पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# 'वॉटर पार्क'साठी तब्बल ३४.४६ लाखांची वीज चोरी

नगर – नगर जवळील नेप्ती शिवारात असलेल्या रेनबो वर्ल्ड वॉटर पार्क साठी तब्बल ३४ लाख ४६ हजार ८९२ रुपयांची ८५ हजार ७२८ युनिट वीज चोरी केल्याचे समोर आले आहे. महावितरणच्या कल्याण येथील भरारी पथकाने ही वीज चोरी पकडत वॉटर पार्क मालकावर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत भरारी पथकातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता उमेश पंडित घुगे यांनी फिर्याद दिली आहे. भरारी पथकाने २० नोव्हेंबर २०२५ रोजी नेप्ती शिवारात असलेल्या रेनबो वर्ल्ड वॉटर पार्क येथे छापा टाकला असता चोरून वीज वापरली जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे महावितरणने वॉटर पार्क मालक निलेश चंद्रकांत गाडळकर यांना वीज चोरीचे ३४ लाख ४६ हजार ८९२ रुपयांचे बिल दिले होते. ते बिल भरण्यासाठी मुदत देण्यात आली. मात्र या कालावधीत गाडळकर यांनी बिल न भरल्यामुळे अखेर त्यांच्याविरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली. या फिर्यादी वरून पोलिसांनी भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# वाहतूक नियमभंग केल्याने वाहनचालकांना दंड



शहरातील पत्रकार चौक येथे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करताना शहर वाहतूक शाखेचे पथक.

नगर – वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर शहर वाहतूक शाखेकडून शहरात कारवाईची मोहिम राबविली जात आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असून, १० मार्च रोजी सायंकाळी केलेल्या कारवाईत २३५ वाहनचालकांवर ई-चलानद्वारे दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत रोख ३८ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून एकूण अनपेड दंडाची रक्कम २ लाख ४६ हजार ६५० रुपये इतकी आहे.

सावेडीतील प्रोफेसर कॉलनी चौक येथे १० मार्च रोजी सायंकाळी अचानक नाकाबंदी करून ही कारवाई करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. तर ९ मार्च रोजी पत्रकार चौक येथे अशी कारवाई करण्यात आली होती. यात वाहनांवर काळी काच असणे (३), परवाना सोबत न बाळगणे (३५), परवाना नसणे (७), ट्रिपल सीट वाहन चालविणे (१३), वाहनास क्रमांक प्लेट नसणे किंवा फॅन्सी नंबर प्लेट बसविणे (४८), वाहन चालविताना मोबाईल फोनवर बोलणे (३) तसेच इतर प्रकारच्या १२६ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली. अशा एकूण २३५ ई-चलानची नोंद करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या आदेशान्वये शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक मन्सूर सय्यद, असिफ शेख, अन्सार शेखे, सहाय्यक फौजदार रामराव शिरसाट, रियाज इनामदार, पोलीस हवालदार खेडकर, पोलीस शिपाई मधुकर ससे, उंडे, खराडे, सतीश दळवी, प्रविण खंडागळे तसेच वॉर्डन अरविंद चौटिले, निखिल कारखेले आणि विशाल खताडे यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले असून अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, वाहनांवर काळ्या काचा लावू नयेत, वाहनांवर नोंदणी क्रमांक स्पष्टपणे लावावा, फॅन्सी नंबर प्लेट व फटाका सायलेन्सरचा वापर करू नये तसेच मद्यपान करून वाहन चालविणे टाळावे. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित वाहतुकीस सहकार्य करावे, असे आवाहन शहर वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.


एक विश्वास.. एक बांधिलकी..

रामकृष्ण अर्बन

## श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लि.अहिल्यानगर

हेड ऑफिस:- रामकृष्ण भवन, जुनी वसंत टॉकीज, माळीवाडा, अहिल्यानगर - ४१४००१

फोन नं. (०२४१) - २३४५०३४, २३४७३१०

## सोनेतारण दागिन्यांचा लिलाव जाहीर नोटीस

श्रीरामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडीट सोसायटी लिमिटेड, माळीवाडा, अहिल्यानगर या संस्थेच्या मुख्य शाखा व सावेडी शाखेत सोनेतारण ठेवून कर्ज घेतलेल्या खाली नमूद केलेल्या कर्जदारांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की त्यांनी संस्थेकडे सोनेतारण ठेवून घेतलेल्या कर्जाची मुदत १ वर्ष होती. विहीत मुदत संपून देखील सदर कर्जाची रक्कम व त्यावरील व्याजाच्या रकमेसाठी वेळोवेळी नोटीसा व स्मरणपत्रे पाठवावी लागली. त्याचा पोस्टेजचा व इतर खर्च संस्थेकडे विहीत मुदतीत जमा करुन सोने चीज वस्तू सोडवून घेणे आवश्यक होते. संस्थेशी सोनेतारण कर्ज घेतेवेळी केलेल्या करारनाम्यातील अटीनुसार व सोनेतारण कर्ज नियमावली क्र. ८,९ व १० मधील तरतुदीनुसार विहीत मुदतीत कर्ज फेड करुन खाते बंद न केल्यामुळे तुम्ही ठेवलेल्या चीज वस्तुंची लिलावाद्वारे विक्री करुन थकबाकी वसुल करण्याचा संस्थेस अधिकार आहे. यामुळे आता या जाहीर नोटीसीद्वारे तुम्हास कळविण्यात येते आहे की, तुम्ही दिनांक १८/३/२०२६ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत तुमच्याकडील थकबाकी पूर्ण भरुन तुमचे सोने चीजवस्तू सोडवून नेल्या नाहीत अथवा खाते नवेजुने करुन दिले नाही तर दिनांक १८/३/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता संस्थेच्या माळीवाडा येथील मुख्य कार्यालयात तुमच्या सोने चीजवस्तूंचा लिलाव करण्यात येईल. सदरच्या लिलावात विक्री आलेल्या रकमेतून कर्ज / व्याज व खर्चाची रक्कम वसूल केली जाईल व लिलावात आलेल्या रकमेतून कर्ज / व्याज व खर्च रक्कम वसुल न झाल्यास त्या रकमेची वसुलीही कर्जदाराकडून करुन घेणेत येईल व त्यानंतर कर्जदारांची कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही त्याची नोंद घ्यावी. तसेच सोनेतारण लिलाव करणे अथवा स्थगित करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक मंडळास राहतील.

### मुख्य शाखा - (लिलाव यादी)

| अ.नं. | खाते नं. | नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १) | १६५/२४९९७९ | जोशी मधुसूदन जगदीश | प्लॉट नं.२,गोकूळधाम बंगला, बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर |
| २) | १६५/२५३२५९ | चौथे हनुमान किसन | बाबुर्डी बेंद द हिवरे झरे, अहिल्यानगर |

### सावेडी शाखा

| अ.नं. | खाते नं. | नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| ३) | १६५/३०७१७० | वाकळे किरण छबुराव | गणेश चौक, सावेडी गाव,सावेडी,अहिल्यानगर |
| ४) | १६५/३०७६४३ | दांगट केतन मुरलीधर | १००७, पारनाईक गल्ली, सर्जेपुरा,अहिल्यानगर |
| ५) | १६५/३०८१६९ | कांबळे आकाश राजेंद्र | गजराज नगर, औरंगाबाद रोड,अहिल्यानगर |
| ६) | १६५/३०८२१४ | कांबळे आकाश राजेंद्र | गजराज नगर, औरंगाबाद रोड,अहिल्यानगर |
| ७) | १६५/३०८२४५ | वाकळे अभिषेक छबू | संघर्ष चौक,सावेडी गाव, सावेडी, अहिल्यानगर |
| ८) | १६५/३०८३४६ | आव्हाड विष्णू बाबाजी | रा.पांगरमल पोस्ट मजले चिंचोली,अहिल्यानगर |

स्थळ - अहमदनगर, दि. ११/०३/२०२६

शशिकांत पुंडलिक, व्यवस्थापक — ओमप्रकाश चांडक, सोनेतारण कर्ज उपसमिती प्रमुख — राजेंद्र मालू, व्हा. चेअरमन — श्री किसनलाल बंग, चेअरमन

सोने तारण कर्ज फक्त ८%* व्याजदरात

